CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. १४ सप्टेंबर २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३४६ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## शहरात विविध ठिकाणी दोघांची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** : शहरातील सोरेगाव आणि शेळगी परिसरात दोघां इसमांनी विविध कारणावरून राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची नोंदी शहर पोलिसात झाली आहे.

त्यापैकी पहिली घटना सोरेगाव येथील बनसिद्ध नगरात मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली. सुधीर विठ्ठल इुरके (वय ५० रा.सोरेगाव) असे गळफास घेतलेल्या इसमाचे नाव आहे. त्याने काल रात्री आठ वाजेच्या सुमारास घरातील छताच्या पंख्याला साडीने गळफास घेतला होता. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजते नाही. हवालदार शेळके पुढील तपास करीत आहेत .

**शेळगी येथे आत्महत्या**

तर दुसरी घटना शेळगी येथील महर्षी गौतम नगरात आज बुधवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. सत्यनारायण जगदीश हेडा (वय ४३) असे आत्महत्या केलेल्या अविवाहित इसमाचे नाव आहे. आज दुपारी १२ वाजण्याच्या पूर्वी त्याने घरातील छताच्या लोखंडी हुकाला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. मयत सत्यनारायण हा अविवाहित आहे. त्याच्या खिशात चिठ्ठी सापडली. त्यात आजारास कंटाळून हे कृत्य केल्याचे लिहिलेले आढळले. या घटनेची नोंद जोडभावीपेठ पोलिसात झाली. हवालदार साळुंखे पुढील तपास करीत आहेत.

# ऑर्डर...ऑर्डर...हाजिर हो!

# ठाकरे गटाला फर्मान



## १६ अपात्र आमदार प्रकरणी आज सुनावणी

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राज्यातील एकनाथ शिंदे गट आणि उद्धव ठाकरे गट यांच्यातील सत्ता संघर्षावरच्या सुनावणीला गुरूवारपासून प्रारंभ होत आहे. शिंदे गटाचे १६ आमदार अपात्रतेविषयीचा हा फैसला असणार आहे. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर यांनी सुनावणी घेण्याचे पाऊल उचलले आहे. त्यानुसार आज ठाकरे गटाच्या आमदारांना हजर होण्याचा आदेश नार्वेकर यांनी दिला आहे. ठाकरे गटाचे प्रतोद आणि आमदार कोणती भूमिका सभापतींपुढे मांडतात, याकडे राज्याचे लक्ष लागून आहे. शिवसेनेचे कोणते आमदार अपात्र ठरणार? याविषयी देखील राज्यात उत्सुकता निर्माण झाली आहे.**

शिवसेनेतील अपात्र आमदारांच्या नोटीसबाबत मोठ्या घडामोडी घडत आहेत. शिवसेना ठाकरे गटाच्या सर्व आमदारांना गुरुवारी दुपारी बारा वाजेपर्यंत उपस्थित राहण्याच्या सूचना नार्वेकर यांनी केल्या आहेत, अशी माहिती ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांनी दिली. आम्हाला आमचे म्हणणे मांडायचे आहे. आम्ही आमचे म्हणणे अध्यक्षांकडे सादर केलेले आहे. अध्यक्षांच्या म्हणण्यानुसार लेखी आणि तोंडी उत्तर आम्ही सुनावणी दरम्यान देऊ,असे नाईक म्हणाले.

आम्ही मागच्या वेळी वैयक्तिक वकील पत्र सर्व आमदारांनी एकत्रित अध्यक्षांना दिले होते. आधी तसेच वकिलामार्फत आमचे लेखी म्हणणे आम्ही वैयक्तिकरित्या अध्यक्षांना देत आहोत. सुनील प्रभू हे आमचे मुख्य प्रतोद आहेत. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या वैधतेबद्दल टिपणी केली आहे, असेही नाईक यांनी सांगितले. १६ आमदारांच्या अपात्रते संदर्भात निर्णय घ्यायचा आहे, मग सर्व आमदारांना सुनावणीसाठी का बोलावलं जात आहे?, असा सवालही नाईक यांनी उपस्थित केला.

शिवसेनेचे प्रतोद कोण आहे? शिवसेना नेमकी कोणाची आहे सगळ्यांना माहिती आहे. फक्त या निर्णयाकडे सर्व जनतेचं सुद्धा लक्ष लागलं आहे.

अध्यक्षांनी स्वतः लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी आमची आणि लोकांची इच्छा आहे, असेही नाईक यांनी सांगितले. आमचे ५४ आमदार जे निवडून आले, त्यांचे प्रतोद हे प्रभू आधी सुद्धा होते आणि कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे आता सुद्धा आहेत. २३ जूनला आम्ही या अपात्रते संदर्भात आमचे म्हणणं अध्यक्षांकडे दिले होते. त्यानंतर आता किती महिने झाले? हा निर्णय लवकर लागणार नाही यामध्ये वेळ काढूपणा केला जाईल, अशी कुजबूज आम्हाला आहे, असा आरोप नाईक यांनी केला.

### ...म्हणून भाजपने राष्ट्रवादी फोडली

आमदार अपात्रतेबाबत सर्वोच्च न्यायालयाने जवळपास सर्व निकाल लिहून दिला असून आता सुनावणीचे काम अध्यक्षांकडे आहे असे शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब म्हणाले.शिंदे गटाचे हे १६ आमदार अपात्र ठरणार असून सरकार वाचवण्यासाठीच भाजपने राष्ट्रवादी फोडल्याचा आरोप त्यांनी केला. परब हे बुधवारी पंढरपूरला दर्शनासाठी आले असता ते माध्यमांशी बोलत होते. सर्वोच्च न्यायालयाने मार्गदर्शक तत्वे घालून दिली असून पूर्णपणे अर्थ लावूनच पाठवले आहेत. आता फक्त निर्णय घेणे बाकी आहे. सध्या हे सरकार वेळ काढण्याचा प्रयत्न करीत आहे. या १६ आमदारांमध्ये मुख्यमंत्री असून यापाठोपाठ इतर २३ आमदारांचे पिटिशन देखील बाकी असल्याने हा वेळकाढूपणा सुरु आहे.

### ठाकरे गटाची रणनीती काय?

या सुनावणीला कसे सामोरे जायचे याचे नियोजन ठाकरे गटाकडून करण्यात आले आहे. ठाकरे गटाकडून त्यांचे दोन वकीलच आमदारांची बाजू अध्यक्षांसमोर मांडणार आहेत. विधानसभा अध्यक्षांकडून वैयक्तिकरित्या आमदारांना आपले म्हणणे मांडा, असे सांगितले तरच आमदार स्वतः आपली भूमिका मांडतील, अन्यथा ठाकरे गटाचे वकीलच सर्व आमदारांची बाजू मांडणार आहेत. या सुनावणीसाठी ठाकरे गटाने आपली रणनिती ठरवली आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या सर्व आमदारांनी वकील पत्र अध्यक्षांकडे सादर केले आहे. ज्यामध्ये दोन पानी आपले लेखी म्हणणं वकिलांच्या मार्फत मांडण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ वकील देवदत्त कामत आणि वकील असीम सरोदे हे ठाकरे गटाची बाजू मांडतील.

### काय आहे प्रकरण

शिवसेनेतील प्रबळ नेते एकनाथ शिंदेंनी काही आमदारांसह बंड केले आणि शिवसेनेत उभी फूट पडली. एकनाथ शिंदेंचा शिंदे गट आणि उद्धव ठाकरेंचा ठाकरे गट असे दोन गट पडले. तेव्हापासूनच राज्याने अभूतपूर्व सत्तासंघर्ष अनुभवला. तेव्हापासूनच आमदारांच्या पात्र-अपात्रतेचा निर्णय ऐरणीवर होता. तसेच, महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाच्या सुनावणी दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने देखील आमदार अपात्रतेचा निर्णय विधानसभा अध्यक्ष घेतील, असे सांगितले होते.

## अनाथाश्रमातील गतिमंद मुलीवर बलात्कार; शिक्षकाला २० वर्षे सक्तमजुरी

सुराज्य/सोलापूर

मतिमंद मुलीच्या अनाथ आश्रमातील एका गतिमंद मुलीवर बलात्कार करणाऱ्या शिक्षकाला २० वर्षे सक्त मजुरी आणि १० हजार रुपये दंड अशी शिक्षा विशेष न्यायाधीश कविता शिरभाते यांनी ठोठावली. संतोष एकनाथ केदार (वय ३६ रा.सोलापूर) असे शिक्षा झालेल्या नराधम शिक्षकाचे नाव आहे.

महिला संरक्षण व सक्षमीकरण संस्था तसेच अपंग अत्याचार संरक्षण समितीच्या पथकाने संबंधित मतिमंद मुलीच्या अनाथाश्रमाला सन २०१९ मधे भेट दिली होती. त्या वेळी गतीमंद मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचे निष्पन्न झाले होते. त्याप्रमाणे संस्थेच्या अध्यक्षांनी पोलीस आयुक्ताकडे तक्रारी अर्ज दिला होता. या प्रकरणाचा तपास करण्याचे आदेश आयुक्त यांनी एमआयडीसी पोलिसांना दिले होते.

तत्कालीन पोलीस निरीक्षक बजरंग साळुंखे आणि महिला फौजदार भाग्यश्री जाधव यांनी या प्रकरणात संतोष केदार या शिक्षकाविरुद्ध लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करून अटक केली.त्यानंतर तपास करून आरोपी विरुद्धचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले होते.

या प्रकरणात सरकार पक्षातर्फे एकूण १० साक्षीदार तपासण्यात आले. त्यात पीडितेच्या वैद्कीय तपासणी करणारे अधिकारी, अधिक्षिका, मानसशास्त्रज्ञ रेडिओलॉजिस्ट आणी तपास अधिकारी यांची साक्ष महाचाची ठरली.तसेच सरकारी वकील यांनी मांडलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी शिक्षकाला २० वर्षे सक्त मजुरी आणि दंडाची शिक्षा सुनावली.

या खटल्यात सरकारतर्फे ॲड. शितल डोके यांनी तर आरोपी तर्फे ॲड. नागराज शिंदे यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून हवालदार प्रवीण जाधव यांनी सहकार्य केले.

> गुन्हा दाखल झाल्यापासून अटकेत असलेला संतोष एकनाथ केदार हा आरोपी कारागृहात बंदिस्त होता. तसेच गुन्ह्याची माहिती असताना देखील तक्रार दिली नाही म्हणून, अनाथाश्रमाच्या अधिक्षका(फिर्यादी), मुख्याध्यापक, शिक्षक, नर्स, संस्थेचे सचिव आणि काळजीवाहक आदी सहा जणा विरुद्ध देखील पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता.

## बैल पोळ्या आधीच बैलासाठी ठेवलेल्या पैशावर डल्ला

### मारहाण करून ४ लाखांचा ऐवज लुटला

सुराज्य/कुर्डुवाडी

कव्हे (ता.माढा) येथे शेतकऱ्याच्या घराचे बंद दरवाजा तोडून सशस्त्र तीन चोरट्यांनी घरात प्रवेश करून महिलेला चाकूचा धाक दाखवून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ४ लाख ४७ हजारांचा ऐवज लुटून नेला. ही घटना बुधवारी दि.१३ रोजी पहाटे ३.१५. ते ३.३० वा सुमारास प्रबोधनकार ठाकरे विद्यालय जवळ घडली. याबाबत रतन महावीर माळी यांनी कुर्डुवाडी पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे.

फिर्यादी कुटुंबीय रात्री जेवण करुन झोपी गेले होते. फिर्यादी महिला घराच्या हॉलमध्ये तर मुलगा व सून आत खोली मध्ये झोपले होते.फिर्यादीचे पती घरासमोरील जनावरांच्या पत्र्याच्या शेडमध्ये झोपले होते. दरम्यान पहाटे ३.१५ वा सुमारास घराच्या मुख्य दरवाजाचा आवाज आल्याने महिलेने पतीला फोन केला झोपेत त्यांनी फोन उचलला नाही.

त्याचवेळी घराचा दरवाजा तोडून अनोळखी तीन सशस्त्र चोरट्यांनी घरात प्रवेश केला. त्यांच्या हातात लाकडी दांडके, चाकू व कटावणी होती. लाकडी दांडके असणाऱ्या चोरट्याने फिर्यादी महिलेला गळ्यातील सोन्याचे गंठण काढून देण्यास सांगितले. त्यास फिर्यादीने नकार देताच हातात चाकू असलेल्या चोरट्याने फिर्यादी महिलेच्या गळ्याला चाकू लावून आरडाओरड करु नकोस असे म्हणत फिर्यादीच्या गळ्यातील १ तोळा वजनाचे सुमारे ३५ हजार रूपयांचे सोन्याचे गंठण काढून घेतले. त्यानंतर कपाटातील २ तोळे वजनाचे सुमारे ७० हजार रुपये किंतीचे सोन्याचे पट्टीचे गंठण, ४ तोळे वजनाच्या सुमारे १ लाख ४० हजार रुपये किंमतीच्या पट्टीच्या सोन्याच्या ६ बांगड्या, २ ग्रॅम वजनाचे ७ हजार रुपये किंमतीचे कानातील सोन्याच्या काड्या व बैल खरेदीसाठी घरामध्ये ठेवलेली सुमारे १ लाख ९५ हजार रोख असा एकूण ४ लाख ४७ हजारांचा ऐवज चोरट्यांनी लुटून नेला.

> **बैल पोळ्या आधीच बैलाचे पैसे लुटले**
>
> बैल खरेदी विक्रीचा व्यवसाय करीत असल्याने बैल पोळ्यानंतर बैल खरेदीसाठी घरात ठेवले पैसे, बैल पोळ्याच्या सणाआगोदर लुटून नेल्यामुळे हळहळ व्यक्त होत आहे.

## पत्नीला दारुच्या नशेत पतीने केली कुऱ्हाडीने मारहाण

सुराज्य/सोलापूर

मोहोळ तालुक्यातील पापरी शिवारात शेतामध्ये खुरपत असणाऱ्या आपल्या पत्नीला पतीने दारुच्या नशेमध्ये येऊन कुऱ्हाडीने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना सकाळी साडेदहा वाजनेच्या सुमारास घडली.

सुभद्रा नागनाथ भोसले (वय ६०) या आपल्या पापरी येथील महादेव मंदिराजवळ असणाऱ्या शेतामध्ये खुरपणीचे काम करत होत्या.

सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास त्यांचे पती नागनाथ मुरलीधर भोसले हे दारू पिऊन त्यांच्या जवळ आले. त्यांच्या हातातील कुऱ्हाडीने पत्नी सुभद्रा हिच्या पाठीत, मानेवर व छातीवर कुऱ्हाडीने वार केला. गंभीर जखमी झालेल्या सुभद्रा यांना मोहोळ येथील लाईफ केअर हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेचा तपास पो.हे.कॉ. चव्हाण हे करीत आहेत.

## सोलापूर जिल्हा परिषदेचे कामकाज पूर्ववत

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या दालनाची धनगर समाजाच्या काही कार्यकर्त्यांनी तोडफोड केली. या निषेधार्थ मंगळवारी संपूर्ण जिल्हा परिषद, सर्व पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीचे कामकाज कडकडीत बंद ठेवण्यात आले.



बुधवार दिनांक १२ रोजी मात्र जिल्ह्यातील आणि मुख्यालयातील सर्व कार्यालयात शांततेत कार्यालयीन कामकाज सुरू होते. सीईओ आव्हाळे यांच्या कार्यालयाची तोडफोड झाल्याने त्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात काही वेळ बसून त्यांनी कार्यालयीन कामकाज पाहिले.

दरम्यान या प्रकरणातील आरोपींना अटक झाली असून त्यांना १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी मिळाली आहे. मंगळवारच्या बंदमुळे जिल्हा परिषदेचे संपूर्ण कामकाज ठप्प झाले होते.

एकीकडे सोलापूर जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती असताना दुसरीकडे कामकाज बंद होणे हे योग्य नाही. जिल्हा परिषदेमध्ये यापुढे अशा कोणत्याही घटना होणार नाहीत याची काळजी आता जिल्हा परिषद घेणार आहे. अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी आव्हाळे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




नुसतं चावल 'चावल'?

कल्याण
600-69-568

मुंबई
377-78-170

## जरांगे-पाटील सीएमसाठी अडून बसले

सुराज्य/जालना

मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून मनोज जरांगे पाटील गेल्या १६ दिवसांपासून जालन्यात आमरण उपोषण करत आहेत.

सरकारने त्यांच्याकडे १ महिन्याचा अवधी मागितला होता. मनोज जरांगे पाटलांनी सरकारची ही मागणी पूर्ण केली असून मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या हातूनच उपोषण सोडणार असल्याचा निर्धार काल केला होता. त्यानुसार, आज मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपोषणस्थळी आज संध्याकाळी पाच वाजता मनोज जरांगे यांची भेट घेणार होते. याबाबत मुख्यमंत्री शिंदे यांचा दौरा देखील आला होता.

मात्र काही वेळापूर्वी मुख्यमंत्री शिंदे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत जरांगे यांच्यासोबत आमची अजून चर्चा सुरू असल्याचं म्हटले आहे. तर, मुख्यमंत्री यांचा हा दौरा आता रद्द झाला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मनोज जरांगे पाटलांसोबत चर्चा सुरू आहे. आमचे मंत्री कालही तिकडे आणि आजही तिकडे जाणार आहेत. त्यांच्याशी सविस्तर चर्चा झाल्यानंतर पुढचा निर्णय घेईन.

मीही काल मनोज जरांगे पाटलांशी चर्चा केली आहे. यावेळी पाटलांनी आमच्यासोबत सकारात्मक चर्चा केली. सरकारची भूमिका, तांत्रिक बाबी त्यांनी समजून घेतल्या आहेत. आज पुन्हा आमचे लोक त्यांच्याशी बोलतील आणि निर्णय घेतला जाईल, असं एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केलं.



> **ही जागा सोडण्याचा प्रश्नच येत नाही**
>
> मराठा समाजाला ३० दिवसांत आरक्षण मिळेल, असं आश्वासन मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री यांनी दिलं तर तुम्ही ही जागा सोडणार का, उपोषण सोडणार का? या प्रश्नावर मनोज जरांगे म्हणाले, नाही, ही जागा सोडण्याचा प्रश्नच येत नाही. त्यांना भेटायला वेळ हवा होता, तो वेळ मी दिला.

> **माझा बाप मला परत हवाय : पल्लवी**
>
> गेल्या १६ दिवसांपासून मनोज जरांगे पाटलांनी उपोषण धरलं आहे. त्यामुळे ते उपोषण केव्हा सोडणार असा प्रश्न जरांगे-पाटील यांची मुलगी पल्लवीला विचारण्यात आला. त्यावर ती म्हणाली की, उपोषण कधी सुटेल हा त्यांचा प्रश्न आहे. उपोषण कधी सोडणार हे पप्पा सांगणार नाहीत. पण, आरक्षण मिळत नाही तोवर ते उपोषण सोडणार नाहीत हे नक्की. पप्पांची काळजी वाटते. ते माझे वडील आहेत. कोणत्या मुलीला वडिलांची काळजी नसते? माझा बाप मला परत हवाय, त्यामुळे आम्हाला आरक्षण लवकरात लवकर द्या, अशी आर्त मागणी तिने सरकारकडे यावेळी केली.

## मराठा आरक्षण: मुदत दिली-घेतली; पुढे काय?

### हा तर विरोधकांचा खोडसळपणा : मुख्यमंत्री

मराठा आरक्षणविषयक सर्वपक्षीय बैठकीनंतर सह्याद्री अतिथिगृह येथे पत्रकार परिषदेपूर्वी आपला आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांचा माईकवरील संवाद 'सोशल मीडीया'वरून चुकीच्या पध्दतीने संपादित करुन फिरविणे अत्यंत खोडसाळपणाचे आहे. मराठा आरक्षणाबाबत सरकार सुरुवातीपासून संवेदनशील असून कायद्याच्या चौकटीत बसेल असे आरक्षण देण्याबाबत सरकार प्राधान्याने काम करीत आहे. शासनाने इतकी चांगली भूमिका घेतली असतांना मुद्दामहून काही विरोधक खोडसाळपणे आणि व्हिडीओ क्लिप चुकीच्या पद्धतीने संपादित करून लोकांच्या मनात गैरसमज पसरविण्याचे काम करीत आहेत हे अतिशय निंदनीय आहे.

CMYK

# मैत्रीचा नवा अध्याय...

पंतप्रधानपदासारख्या वरिष्ठ पदावर बसलेल्या व्यक्तीला आंतरराष्ट्रीय राजकारण पहावे लागते.शेजारच्या राष्ट्रांशी तसेच विकसित देशांशी चांगले संबंध ठेवावे लागतात.कारण कुठल्याही देख स्वावलंबी नाही.साऱ्याच देशांना परावलंबी रहावे लागते. दळणवळण आणि व्यापार हे जगासाठी अत्यंत महत्त्वाचे असते. भारताने ही सहिष्णुता सदैव जपली आहे. अगदी शत्रूत्व घेतलेल्या पाकशी देखील भारताने कधीच वैर घेतले नाही.त्यामुळे जगात भारताची मान उंचावली आहे.त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय उपखंड,अमेरिका,पूर्व आशिया आणि आखाती देशांशी देखील सलोखा ठेवला आहे.आपल्या देशातील विरोध जी-२० शिखर परिषदेवर टीका करत आहेत पण या परिषदेविषयी बारकाइ१ने अभ्यास करण्याची त्यांची मानसिकता दिसत नाही. पण अर्थव्यवस्था आणि व्यापर क्षेत्रातील जाणकारांकडून मात्र परिषदेतील अनेक निर्णयांचे स्वागत केले जात आहे हे विशेष. दिल्लीत आलेले सौदी अरेबियाचे राजपुत्र आणि पंतप्रधान मोहम्मद बिन सलमान अल सौद यांचा दुसऱ्या दिवशी भारताने सरकारी पाहुणचार केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट असा हा कार्यक्रम होता. या वेळी भारत आणि सौदी अरेबियाने तब्बल आठ करार करून आपले द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याचा निश्चय केला. महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचा रत्नागिरी जिल्ह्यातील पेट्रोकेमिकल प्रकल्प अधिक वेगाने पूर्ण करण्याबाबत या वेळी चर्चा झाली. या करारांचा भारताला अनेक क्षेत्रांसाठी लाभ होणार आहे. भारत आणि सौदी अरेबिया यांच्यातील व्यापारी संबंधांना काही शतकांचा इतिहास आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर हे संबंध अधिकच दृढ झाले आहेत. १९४७ सालीच भारत आणि सौदी अरेबियाचे राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले. दोन्ही देशांचे राष्ट्रप्रमुख नियमितपणे एकमेकांना भेटी देत असतात. १९५५ साली सौदीचे सम्राट सौद बिन अब्दुलअझिझ अल सौद हे तब्बल



१७ दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले होते. त्यानंतर पुढल्याच वर्षी तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी सौदीचा प्रदीर्घ दौरा केला. २०१९ साली 'भारत आणि सौदी अरेबिया भागीदारी परिषदे'ची स्थापना करण्यात आली. या माध्यमातून दोन्ही देशांमध्ये धोरणात्मक सहकार्याचा पाया रचला गेला. २०२२-२३ या आर्थिक वर्षात उभय देशांमधील व्यापार ५२.७५ अब्ज डॉलरच्या सर्वकालीन उच्चांकावर राहिला. भारत हा सौदी अरेबियाचा दुसरा मोठ्या व्यापारी भागीदार असून भारतासाठी सौदी चौथा मोठा भागीदार आहे. केवळ इंधन किंवा ऊर्जा नव्हे, तर संरक्षण क्षेत्रातही परस्पर सहकार्य करण्यासाठी संयुक्त समितीच्या नियमित बैठका होत असतात.ऊर्जा, माहिती तंत्रज्ञान, संग्रहालये, गुंतवणूक, बँकिंग, लघू व मध्यम उद्योग बँक अशा विविध क्षेत्रांमध्ये भारत व सौदी अरेबियाने सोमवारी सहकार्य करार केले. या आठ करारांमध्ये दोन्ही देशांमधील आर्थिक गुन्ह्यांवर लक्ष ठेवणाऱ्या संस्थांमधील (भारताचा केंद्रीय दक्षता आयोग व सौदीचे भ्रष्टाचारविरोधी प्राधिकरण) कराराचाही सहभाग आहे. याखेरीज भारत आणि सौदीमधील कंपन्यांमध्ये ४७ सामंजस्य करारही सलमान आणि मोदी यांच्या साक्षीने झाले. भारतातील सिरम इन्स्टिट्यूट, हिंदुस्तान पेट्रोलियम, व्हीएफएस ग्लोबल, आयसीआयसीआय बँक यांनी सौदीमध्ये गुंतवणुकीसाठी करार केले आहेत. या करारांमुळे आगामी काळात दोन्ही देशांतील व्यापार नव्या उंचीवर जाईल, असा विश्वास सौदीचे गुंतवणूकमंत्री खालिद अल फली यांनी व्यक्त केला. याखेरीज भारत आणि सौदी यांचे 'पॉवर ग्रिड' समुद्राखालून केबल टाकून जोडण्याचा करारही करण्यात आला आहे. त्यामुळे विजेचे हस्तांतरण अधिक सुलभ होणार असून याद्वारे आगामी काळात भारत प्रथमच सौदी अरेबियाला अपारंपरिक ऊर्जेचा पुरवठा करेल. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर जगातील सर्वात मोठ्या तेलशुद्धीकरण प्रकल्पाबाबत मोदी आणि सलमान यांच्यात चर्चा झाली. 'आरआरपीसीएल' ही कंपनी तीन भारतीय तेल कंपन्यांची भागीदारीतील कंपनी आहे. एकीकडे कोकणामध्ये या प्रकल्पाच्या जागेवरून वाद सुरू असताना मोदी-सलमान यांच्यातील चर्चेत प्रकल्पाची गती वाढविण्याचे निश्चित झाले आहे. त्यामुळे सौदी आणि भारत यांच्या मैत्रीतील हा नवा अध्याय मानला जात आहे.

## उत्सव विशेष

**पोळा किंवा बैलपोळा हा श्रावण अमावस्या किंवा भाद्रपद अमावास्या या तिथीला प्रदेशानुसार साजरा करण्यात येणारा बैलांचा सण आहे.१ बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा एक मराठी सण असून हा विशेषतः विदर्भात भव्य पातळीवर साजरा केला जातो, विदर्भातील सीमेवर असलेल्या मध्य प्रदेश व तेलंगण सीमाभागातसुद्धा हा सण साजरा होतो. ज्यांच्याकडे शेती नाही ते मातीच्या बैलाची पूजा करतात.२३ नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी या सणांबरोबरच सरत्या श्रावणात पिठोरी अमावस्येला संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो असा सर्जा-राजाचा सण म्हणजे पोळा.**

---

हा दिवस बैलांचा विश्रांतीचा दिवस असतो.५पोळ्याच्या आदल्या दिवशी बैलांना आमंत्रण (आवतण) देण्यात येते. पोळ्याला त्यांना नदीवर/ओढ्यात नेऊन त्यांना आंघोळ घालतात. नंतर चरायला देऊन घरी आणतात. या दिवशी बैलाच्या खांद्याला (मान जिथे शरीराला जोडली असते तो भाग) हळद व तुपाने (किंवा तेलाने) शेकतात. याला 'खांद शेकणे' अथवा 'खांड शेकणे' म्हणतात. त्यांच्या पाठीवर नक्षीकाम केलेली झूल (पाठीवर घालायची शाल), सर्वांगावर गेरूचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या व घुंगरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा (आवरायची दोरी) पायात चांदीचे वा करदोड्याचे तोडे घालतात. त्याला खायला गोड पुरणपोळी व सुग्रास अन्नाचा नैवेद्य देतात.५ बैलाची निगा राखणाऱ्या 'बैलकरी' घरगड्यास नवीन कपडे देण्यात येतात.६

या सणासाठी शेतकऱ्यांमध्ये उत्साह असतो. आपला बैल उठून दिसावा यासाठी शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे त्याचा साजशृंगार खरेदी करतात. बैल सजवितात व पोळ्याच्या मिरवणुकीत भाग घेतात.७ गावाच्या सीमेजवळच्या शेतावर (आखरावर) आंब्याच्या पानाचे एक मोठे तोरण करून बांधतात. या सणादिवशी महाराष्ट्रातल्या खेड्यांमधल्या प्रत्येक घराला आंब्याच्या पानांचे तोरण बांधले जाते. ८ त्या जवळ गावातल्या सर्व बैलजोड्या, वाजंत्री, सनई, ढोल, ताशे वाजवत एकत्र आणल्या जातात. या वेळेस 'झडत्या' (पोळ्याची गीते) म्हणायची पद्धत आहे. त्यानंतर, 'मानवाईक' (ज्याला गावात मान आहे तो-गावचा पाटील/श्रीमंत जमीनदार) तोरण तोडतो व पोळा 'फुटतो'. नंतर बैल मारुतीच्या देवळात नेतात व नंतर घरी नेऊन त्यांना ओवाळतात. बैल नेणाऱ्यास 'बोजारा' (पैसे) देण्यात येतात.९ शेतकरी वर्गात हा सण विशेष महत्त्वाचा मानला गेल्याने तो उत्साहाने साजरा करण्यात येतो.१०

कर्नाटकी बेंदूर

# पोळा सणावर दुष्काळाचे सावट

महाराष्ट्र- कर्नाटक सीमेवरील काही भागात उदा. कोल्हापूर जिल्ह्यात कर्नाटकी बेंदूर साजरा केला जातो.११ हा सण वटपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी असतो.या दिवशी बैलांना शेतीच्या कामातून विश्रांती दिली जाते. १२पोळ्याप्रमाणेच बैलांना सजवून मिरवणुका काढल्या जातात. संध्याकाळी कर तोडण्याचा कार्यक्रम असतो.

दोन दिवसांवर बैलपोळ्याचा सण आला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची लगबग पाहायला मिळत आहे. बाजारपेठा रंगीबेरंगी साहित्यांनी सजल्या आहेत. मात्र, यावर्षीच्या बैलपोळा सणावर दुष्काळाचं सावट आहे. कारण राज्यातील बहुतांश भागात अद्याप म्हणावा तसा पाऊस झाला नाही. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. तर दुसरीकडं पोळा सणावर लम्पी स्कीन आजाराचं सावट देखील आहे.



दरम्यान, दिवसेंदिवस पशुधनाची संख्या घटत आहे. पशुधन घटण्याची नेमकी कारणं काय आहेत, तसेच राज्यातील पशुधनाची नेमकी स्थिती काय? याबाबतची सविस्तर माहिती ज्येष्ठ पशुवैद्यक नितीन मार्कंडेय सर यांनी दिली आहे.

शेतकऱ्यांच्या दृष्टीनं बैलपोळ्याच्या सणाला विशेष महत्व आहे. दरवर्षी मोठ्या उत्साहात बैलपोळ्याचा सण साजरा केला जातो. मात्र, यावर्षी या सणावर लम्पी स्कीन आजाराचं सावट आहे. तर दुसकरीकडं पावसाचं प्रमाण देखील कमी आहे. त्यामुळं शेतकरी चिंतेत असल्याचे नितीन मार्कंडेय म्हणाले. राज्याचा विचार केला तर सध्या पशुधनाची संख्या ही एक कोटी ३९ लाख आहे. यामधील एक कोटी १० लाख जनावरे ही वंशावळीची माहिती नसणारी असल्याचे मार्कंडेय म्हणाले. यातील १५ लाख जनावरे ही शुद्ध जातीची आहेत. तर उरलेली जनावरे २% लाख जनावरे संकरीत आहेत. राज्यात म्हशींची संख्या ही ५५ लाखांच्या आसपास असल्याची माहिती मार्कंडेय यांनी दिली. राज्यात सात प्रकारच्या अधिकृत नोंदणी असलेल्या गायींच्या जाती आहेत.

बैलांचं प्रमाण का घटलं?

शेती क्षेत्रात दिवसेंदिवसं मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरणाचा वापर सुरु झाला आहे.

जातीवंत बैलांची पैदास कमी होऊ लागली, त्यामुळं शेती क्षेत्रातील बैलांची संख्या कमी होऊ लागली

शेतीसाठी लागणाऱ्या यंत्रांवर सबसीडी दिली जात आहे, त्यामुळं बैलांची संख्या वाढली आहे.

बैलांकडे शेतकऱ्यांचे दुर्लक्ष, त्यामुळं आजारांचं प्रमाण वाढले

लम्पी स्कीन आजारामुळं गायींपेक्षा बैलांचा जास्त प्रमाणात मृत्यू झाला आहे.

बैलांचं प्रमाण वाढवण्यासाठी काय करावं लागेल?

शेतात बैलांचा वापर वाढवावा लागेल.

शुद्ध बैलांची पैदास करण्यासाठी चांगले वळू निर्माण करावे लागतील.

शेतकऱ्यापर्यंत गोशाळा पोहोचायला हव्यात.

शेतकऱ्यांनी गोशाळा जगवाव्यात, गोशाळ्याने शेतकरी जगवावेत.

बैलांसाठी मोफत उपचार करावे

बैलांच्या संवर्धनासाठी काही योजना आखणं गरजेचं

दिवसेंदिवस शेतात यांत्रिकीकरणाचा वापर वाढला आहे. त्यामुळं बैलांची संख्या कमी झाली आहे. शेतकरी शेतात यंत्राचा वापर मोठ्या प्रमाणावर करु लागला आहे. त्यामुळं अनेक शेतकऱ्यांकडे बैलपोळा साजरा करण्यासाठी बैलच नसल्याची माहिती नितीन मार्कंडेय यांनी दिली. बैलांचा वापर वाढला तर जमिनीच सकपणा वाढेल असेही मार्कंडेय म्हणाले.

दरम्यान, येत्या गुरुवारी १४ सप्टेंबरला बैलपोळ्याचा सण साजरा केला जाणार आहे. मात्र, यावर्षी लम्पी स्कीनच्या प्रादुर्भावामुळं अनेक जिल्ह्यांमध्ये बैलांच्या मिरवणुकांवर प्रतिबंध घालण्यात आला आहे. साधेपणाने सण साजरा करा असे सांगण्यात आले आहे. त्यामुळं शेतकऱ्यांनी खबरदारी घेऊन सण साजरा करवा असे आवाहन मार्कंडेय यांनी केलं. जनावरांना सम्री स्कीन आजाराची लागण झाली असल्यास औषधोपचार घ्यावेत, आयुर्वेदिक उपचार घ्यावेत असेही मार्कंडेय म्हणाले.

**- प्रतिनिधी**

## टुडेज् ब्लॉग

# सभागृहाच्या परंपरा पाळायलाच हव्यात

**बांग्लादेशाचे दोन भाग झाले. विरोधी पक्षाचे लोकसभेचे नेते म्हणून स्वर्गीय इंदिराजींना अटलजींनी दुर्गा म्हटले होते. तसेच नेहरूंचं बोलावणं आल्यावर सह्याद्री हिमालयाच्या मदतीला जातोय असे स्वर्गीय चव्हाण साहेबांबद्दल बोलले गेले. परंतु आज साऱ्या सात्वीक परंपरा धुळीला मिळाल्या आहेत. नेता डोक्यावर पडल्यासारखा बोलतोय त्यामुळे मराठी मुलुख मात्र बदनाम होतोय. नारायण धुळप, दत्ता पाटील, राम नाईक, राम कापसे, केशवराव धोंडगे सभागृहाच्या परंपरा राखून सांभाळून संयमाने बोलायचे. कोण्याएका तुराटीने उर बडवत टरबूज म्हटले. तर उद्या उत्तर म्हणून भाजपने तुराटीला तुणतुणे म्हटले; तर सत्तर किलोने पस्तीस किलोला हिबाळून दिल्यासारखे होईल.**

---

शेवटी म्हटले तर संस्काराचा भाग येतो. नाहीतर अशा फालतू तिडतिड्याच्या बोलण्याकडे







दुर्लक्ष करणे अधिक चांगले. महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री झाला अडिच वर्षात विरोधीपक्षनेते म्हणून देवेंद्रभाऊंनी आदळाआपट न करता शांतपणाने बोलते झाले. आणि संधी आल्यावर करेक्ट कार्यक्रम केला. आपली लायकी नसताना टरबुजे म्हणताय डोक्यावर पडल्यासारखे बोलताय. चुकून देवेंद्रभाऊ रागायवले आणि तुमच्या वर पाय पडला तर पालिसारखे चपटे व्हाल; जरा जपून.राजकारणात अरे ला कारे म्हणने ओघाने आलेच. पुढे कलगीतुऱ्यात बोलणं वाढत जातं. आणि वात्रट बोलणं आणखी वाढत जाईल. मग विदर्भाची पळाटी (तुराटी) होईल. उध्दवजी दोष तुमचा नाही. उथळ पाण्याला खळखळाट अधिक असतो. आठ आमदार आणि तीन खासदार वाचलेत. अशावेळी आब राखून बोलणं अधिक चांगलं. कधीकाळी एका जुन्या जाणत्या नेत्याला शिवसेनेने मैद्याचे पोते म्हटले होते; तर हाताला धरून मुख्यमंत्री केलं आणि सेना कधी बारीक झाली हे सेनेलाही कळलं नाही. अखेर मैद्याच्या पोत्यानेच पोत्यात घातले. एकूणच उध्दवजी चौथाळून बोलणे अंगावर येते. एकाच संयुक्त जाहीरनाम्यावर आपण निवडून आलो. हृदयसमाटांचा, जागतीक नेते मोदी साहेबांचा फोटो लावून आपण मताची भीक मागितली. निदान आतातरी मातोश्री दोनवर जाऊन चिंतन करा. कारण ज्यांचे नाव सांगून निवडणूका जिंकल्या त्यांच्यावरच मुख्यमंत्र्याच्या लालसेने बंदुका उलट्या धरल्या. हे चांगले झाले नाही. जनावरांना नाती कळत नसतात. परंतु माणूस घडताना माणसाला नाती कळतात. म्हणून आपल्या बोलण्याचा कचरा होतोय, गोड बोलून दोन पक्षांनी आपल्याच खांद्यावर हात ठेवून राष्ट्रवादी मोठी केली. आपोआप सेना बारीक झाली. मैद्याचे पोते असो अगर टरबूज असो अंगावर पडले तर आपण पालीसारखे चपटे व्हाल. म्हणून निवडून कुणाबरोबर आलो आणि शिव्या देत कुठं पोहोचलो हे असं वागणं बरं नाही.

**- लक्ष्मण ढोबळे**

## जन्म हा अखेरचा

# वाणी संतांची

मग शरीर संचु पार्था । अशेषुही सर्वथा । पार्ष्णीचा माथा । स्वयंभु होय ।।

अर्जुना ! मग हे शरीर घोटाच्या माथ्यावर आधाराशिवाय स्वतः सिध्द राहते.



अर्जुना हें जाण । मूळबंधाचें लक्षण । वज्रासन गौण । नाम यासी।।

अर्जुना ! हे मूलबंधाचे लक्षण जाणून घे. याचेच वज्रासन असे गौण नाव आहे.

ऐसी आधारीं मुद्रा पडे । आणि आधींचा मार्गु मोडे । तेथ अपानु आंतलीकडे । वोहोंटो लागे ।।

अशा प्रकारे आधारचक्रावर (मुळबन्ध बरोबर लागला) वज्रसनाची मुद्रा पडते आणि खालचा मार्ग बंद पडला म्हणजे अपानवायू आतल्या आत वर सरकू लागतो.

तंव करसंपुट आपैसें । वाम चरणीं बैसे । तंव बाहुमुळीं दिसे । थोरवी आली ।।

नंतर सहजच डाव्या पायावर दोन्ही हात द्रोणाकर करून ठेवाव्यात. त्यामुळे दोन्ही खांदे वर चढलेले दिसतात.

माजी उभारलेनि दंडें । शिरकमळ होय गाडें । नेत्रद्वारीची कवाडें । लागूं पहाती ।।

उंचावलेल्या दंडाकार खांद्यामुळे शिरकमल दोन्ही खांद्यात घट्ट राहते. मग डोळ्यांच्या पापण्या हळूहळू मिटू लागतात.

वरचिलें पाती ढळती । तळींची तळीं पुंजाळती । तेथ अर्धोन्मीलित स्थिती । उपजे तया ।।

वरची पापणी खाली येते व खालची पापणी खालीच विकसित होते. त्यावेळी डोळ्यांची अर्धी उघडलेली व अर्धी मिलेली अशी दृष्टी होते.

दिठी राहोनि आंतुलीकडे । बाहेर पाऊल घाली कोंडे । ते ठायीं ठावो पडे । नासाग्रपीठीं ।।

दृष्टी ही आतल्याआत अंतर्मुख होऊनही स्वतःच्या इच्छेने बाहेर पाऊल टाकते आणि नाकाच्या शेंड्यावर स्थिर होते.

ऐसें आंतुच्या आंतुचि रचे । बाहेरी मागुतें न वचे । म्हणौनि राहणें आधियें दिठीचें । तेथेंचि होय ।।

अर्धोन्मीलित स्थितीमध्ये दृष्टी आतच राहते, ती पुनः बाहेर येत नाही; म्हणून अर्धीच दृष्टी नाकाच्या शेंड्याच्या ठिकाणी स्थिर राहते.

## जनमानस

# पक्षांची घटती संख्या चिंतेचा विषय

देशातील पक्षांच्या अभ्यासासाठी हजारो पक्षितज्ज्ञांनी आणि निसर्गप्रेमींनी सुमारे एक कोटी घटनांचे व बदलांचे आकलन करीत भारतातील पक्षांची स्थिती - २०२३ या नवे एक अहवाल तयार केला आहे. त्यामध्ये ९४२ प्रजातींचे आकलन केले असून अंदाजे ३०० प्रजातींबद्दल फारच कमी माहिती मिळू शकली. या अभ्यासात झपाट्याने घटत असलेल्या पक्षीसंख्येची कारणे समोर आली आहेत. विकासाच्या नावाखाली जंगलतोड केली जात आहे. पक्षांचा अधिवास असणाऱ्या असंख्य झाडांवर हातोडे पडत आहेत. त्यामुळे पक्षांना खाद्य मिळविणे कठीण होत आहे. बदलते हवामान, प्रदूषण अशा कारणांनी पक्षांच्या प्रजनन क्षमतेवर परिणाम झाले आहेत. पीक वाढ आणि किटकांपासून संरक्षण करण्यासाठी कीटकनाशकांच्या फवारण्यांमुळे पक्षांच्या आवडते खाद्यकिडे कमी होत आहेत. हवामान बदल, पक्षांच्या खाद्यांनाची चणचण, यांमुळे पक्षांना काही आजार जडत आहेत. कळपाने राहणाऱ्या पक्षांना अशा आजारांचा संसर्ग होऊन पक्षी दगावतात त्यांची संख्यामापन करणे शक्य होत



नाही. अनेक कारणांनी पक्षांच्या विविध जाती लुप्त होत चालल्या आहेत तर काही प्रजातींची संख्या बोटांवर मोजण्याइतपत शिल्लक राहिली आहे. काही काळापूर्वी जंगलांत प्राण्यांच्याबरोबर पक्षांचीही शिकार केली जात असे ते पक्षांच्या संख्येतील घट होण्याचे कारण मानले जात असे. आता मात्र वाढलेली हवाई सेवा, मोबाईल टॉवर्स हे पक्षांच्या मोकळ्या विहारात अडचणींचे ठरत असून पक्षांच्या संख्येत घट होण्यास कारणीभूत होत आहेत. पक्षांची घटत असलेली संख्या हा देशाच्या जैवविविधतेवर घातक परिणाम होत असल्याची लक्षणे आहेत. गेल्या दोन तीन दशकांत लुप्त झालेल्या पक्षांच्या विविध प्रजाती मानवाकडून विकासाच्या हव्यासापोटी सुरू असलेल्या कार्यक्रमांचे बळी आहेत असे म्हणायला हरकत नाही कारण पूर्वी ज्या संख्येने पक्षांचे थवेच्या थवे आकाशात विहार करताना दिसत असत ते दृश्य आता फार कमी प्रमाणात दिसून येते त्याला झाडांची केली जाणारी कत्तल हे प्रमुख कारण असू शकते. तसाच झाडांवरचा पक्षांचा किलबिलाटही थंडावला आहे. हा मानव जातीला एक प्रकारचा सावधतेचा इशाराच आहे असे विचारांती लक्षात येते. म्हणून हीच वेळ आहे सजीवांच्या आयुष्याची काळजी घेण्याची.!

**- स्नेहा राज,**
गोरेगांव.

## हिंदी दिवस विशेष

# विश्वबंधुत्वाची भाषा

आपला भारत देश विविधतेने नटला असून देशात अनेक भाषा बोलल्या जातात. तथापि, भारतीय संविधानाने १४ सप्टेंबर १९४९ ला हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा दिला आहे. म्हणून दरवर्षी १४ सप्टेंबरला हिंदी दिवस साजरा केला जातो. यादिवशी शाळा, महाविद्यालयातून विद्यार्थी हिंदी दिवसाच्या निमित्ताने भाषण, कविता, शायरी सादर करून हिंदी भाषेचा सन्मान आणि गौरव केला जातो. १४ सप्टेंबर १९५३ ला सर्वप्रथम हिंदी दिवस साजरा केला गेला. तेव्हापासून दरवर्षी हिंदी भाषेचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी हिंदी दिवस साजरा केला जातो. याच दिवशी राष्ट्रीय एकता दिवस ही साजरा केला जातो. आज हिंदी जगामध्ये सर्वात जास्त बोलल्या जाणाऱ्या भाषेपैकी एक असून १० जानेवारी १९७५ ला नागपूर येथे जागतिक हिंदी दिवस साजरा केला गेला. त्यानंतर १० जानेवारी २००६ पासून विश्व हिंदी





दिवस साजरा करण्याचे जाहीर करण्यात आले. हिंदी दिवस देशातील सर्व लोकांना एकत्र आणण्याबरोबरच देशभक्तीसाठी प्रेरित करतो. जगातील सर्व प्रगत भाषांमध्ये हिंदी सर्वात नीटनेटकी, सरळ आणि लवचिक भाषा असून लिहिण्यासाठी वापरली जाणारी देवनागरी लिपि वैज्ञानिक आहे तर हिंदी भाषेकडे विपुल शब्दसंपदा असून अडीच लाखांहून अधिक मूळ शब्द आहेत, जे इंग्रजी भाषेकडे दहा हजार आहेत. हिंदी बोलणाऱ्या आणि समजणाऱ्यांची संख्या ५० कोटीहून जास्त असून सामान्यांशी जोडलेली समृद्ध भाषा आहे. स्वातंत्र्यलढ्या मध्ये हिंदीने विशेष भूमिका बजावली होती. हिंदीचा जोर वाढत आहे





जागतिक स्तरावर वाढत असलेल्या भारताच्या चमक, संस्कृती आणि सभ्यतेच्या माध्यमातून जगात हिंदीची लोकप्रियता वाढत आहे. हिंदी भाषेला साहित्यनिर्मितीची दीर्घ परंपरा आहे आणि तिचे सर्व प्रकार वैविध्यपूर्ण आणि समृद्ध आहेत. सूर, कबीर, तुलसी, मीरा, रसखान, जायसी, भारतेंदू, निराला, महादेवी, अज्ञेय, महावीर, जयशंकर, प्रेमचंद, अमृता आदींनी या भाषेचे साहित्य आपल्या लेखणीने जागतिक पटलावर प्रस्थापित केले आणि जगाला साहित्याचे अमृतपान करवले. हिंदी ही भारतीय जनसंवाद जगतातील सर्वोत्तम भाषा आहे. आजही भारतातील मनोरंजन जगतात हिंदीचे वर्चस्व आहे. आजही, हिंदी चित्रपट जागतिक स्तरावर हिंदी भाषिकांना जोडण्याचे आणि इतरांना हिंदी भाषा शिकण्यासाठी प्रेरित करण्याचे काम करतात. भारताची संस्कृती, धर्म, ज्ञान, विज्ञान आणि भाषा संपूर्ण जगाला विश्वबंधुत्वाचा धडा शिकवते आणि त्यांना स्वतःमध्ये आत्मसात करते. शेवटी, परकीय भाषा ही स्वतंत्र राष्ट्राच्या राज्यकारभाराची आणि शिक्षणाची भाषा असेल, तर ती सांस्कृतिक गुलामगिरी वाटते.

**- प्रा. व्ही. व्ही. कोष्टी**
शिपूर (जि.सांगली)

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# ड परिमंडल विभागातील रेशन दुकानदारांची बनवाबनवी

## सहा महिन्यांपासून करतात ग्राहकांना फक्त एक किलो गव्हाचे वाटप

✔ सुराज्य/सोलापूर

ऑनलाईन प्रणाली ,आयएसओ मानांकन, यासारख्या योजनांच्या माध्यमातून रेशन दुकानदाराचा कारभार पारदर्शक होत असताना काही दुकानदारांना कृतीमुळे पुरवठा विभाग पुन्हा बदनामीच्या खाईत लोटला जात आहे. असाच काहीसा प्रकार ड परिमंडल विभागातील रेशन दुकानदारांकडून केला जात असल्याच्या तक्रारी ग्राहकांच्या आहेत. तब्बल सहा महिन्यापासून अन्नधान्याचा सर्व कोटा उचलून देखील ग्राहकांच्या माती फक्त एक किलो गहू गेल्या सहा महिन्यापासून वाटप करत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

गोर गरीबाच्या तोंडातील घास हिराऊन घेऊन बाजारात विल्हेवाट लावणाऱ्या या रेशन दुकानदारांच्या गोरख धंद्याला अन्नधान्य वितरण अधिकारी लगाम लावणार का? असा प्रश्न ग्राहक विचारत आहेत.

सोलापूर शहरातील ड परिमंडल विभागाअंतर्गत एकूण ६७ दुकानदार येतात. त्यामध्ये अन्नसुरक्षा योजनेचे २२ हजार ६९९ कार्डधारक असून त्याची लोकसंख्या ९५ हजार ८०० आहे तर अंत्तोदय योजनेचे पंधराशे एक कार्ड आहे. त्याची लोकसंख्या एक लाख १६ हजार ६२२ आहे. अन्नसुरक्षा योजर्नेतर्गत येणाऱ्या कार्डधारकांना दोन किलो गहू आणि तीन किलो तांदूळ प्रती मानसी दिला पाहिजे तर अंत्तोदय योजनेअंतर्गत ग्राहकाला २० किलो गहू आणि १५ किलो तांदूळ असे ३५ किलो धान्य वाटप केले पाहिजे. मात्र याच परिमंडल विभागातील ड ४२ सह अनेक दुकानदार सर्व प्रत्येक महिन्याचा पूर्ण कोटा उचल करून देखील ग्राहकांच्या माथी प्रति मानसी फक्त एक किलो धान्य देत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत . धान्य कमी आले आहे, धान्याचा कोटा आला नाही असे विविध कारणे सांगत एक किलो धान्य ग्राहकांच्या माती मारत आहेत प्रति मानसी उचललेले धान्य पाहता प्रत्येक महिन्याला लाखो रुपयाचे धान्य बाजारात जात असल्याचा संशय येथील एक सामाजिक कार्यकर्ते मनोज चलवादी यांना आल्याने या संदर्भात अन्नधान्य वितरण अधिकारी आणि ड परिमंडल विभागाकडे तक्रारी देखील केली आहे. मात्र या तक्रारीकडे कोणी दखल घेत नाही. अन्न अन्नधान्य वितरण अधिकारी किंवा ड चे परिमंडल अधिकारी करतात तरी काय ? असा प्रश्न त्या सामाजिक कार्यकर्ते चालवादी यांना पडला आहे.

> रामवाडी परिसरात राहण्यास आहोत. आमचं या भागातील रेशन दुकानदारांकडे रेशन कार्ड आहे. कार्ड धारकावरील संख्या पाहता जादा धान्य मिळणे अपेक्षित आहे मात्र प्रति माणसी फक्त एक किलो धान्य देत असल्याची आईची तक्रार होती. म्हणून त्या विचारण्यास गेले असता कोटा आला नसल्याचे संबंधित दुकानदाराने सांगितले. याची खातरजमा पुरवठा अन्नधान्य वितरण अधिकारी परिमंडल युवा कडे केली आहे.
>
> – **मनोज चलवादी** (तक्रारदार)

> अंत्तोदय योजनेत देखील सुद्धा धान्य वाटपामध्ये मोठी तफावत आहे.प्रती कार्ड ३५ किलो धान्य मिळणे अपेक्षित असताना आठ किलो गहू आणि १५ किलो तांदूळ फक्त देऊन १० किलो गव्हाची प्रति कार्ड मागे काटेमारी करून धान्य काळा बाजारात विकून लाखो रुपयांचा काळाबाजार या भागातील दुकानदार करत असल्याच्या तक्रारी आहेत.

> दुकानदाराच्या तक्रारी आल्यानंतर दुकानदारांची तपासणी केली जाते. दोन महिन्यापूर्वी एक तपासणी घेण्यात आली. मात्र या तपासणीचा अहवाल अद्याप गुलदस्त्यामध्ये आहे. त्यामुळे अन्नधान्य वितरण अधिकारी आणि इ. परिमंडल अधिकारी करतात तरी काय हा असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.



## पूर्व विभाग सार्वजनिक मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळातर्फे पारितोषिक वितरण

✔ **सोलापूर** : पूर्व विभाग सार्वजनिक मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळातर्फे पारितोषिक वितरण करण्यात आले. पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांच्या हस्ते गणेशोत्सव मंडळांना पारितोषिके देण्यात आली. पूर्वभाग सार्वजानिक वाचनालयात हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी व्यासपीठावर पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने, पूर्व विभाग सार्वजनिक महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष जनार्दन कारमपुरी, माजी महापौर महेश कोठे, पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप, माजी नगरसेवक सुरेश पाटील, रामचंद्र जन्नू, जगदीश पाटील, पांडुरंग दिड्डी, पं. वेणुगोपाल जिल्ला पंतलु, शंकर चौगुले, चन्नवीर चिट्टे, मेघनाथ येमूल, अक्षय अंजिखाने, सागर अतनुरे, उत्सव अध्यक्ष संजय साळुंखे, संदीप महाले, किरण वल्लाल, अनिल वंगारी उपस्थित होते. यावेळी उत्कृष्ट, ढोल ताशा पथक, लेझिम, शिस्तबध्द मिरवणूक, सांस्कृतिक कार्यक्रम, सजीव देखावा आदी पारितोषीक देण्यात आली.गणेशोत्सव मिरवणूक डॉल्बीमुक्त काढण्याची मोहिम पूर्व विभाग सार्वजनिक मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळातर्फे मागीलवर्षी राबविण्यात आली होती. या मोहिमेस पूर्वभागातील गणेशोत्सव मंडळांनी सकारात्मक प्रतिसाद देत डॉल्बीमुक्त मिरवणूक काढली होती. त्याबद्दल मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष संजय साळुंखे आणि सहकाऱ्यांचे पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांनी कौतुक केले.




## रोटरी क्लब तर्फे इको फ्रेंडली गणेश मूर्ती बनवण्याची कार्यशाळा

✔ **सोलापूर** : सिध्देश्वर कन्या प्रशालेत इको फ्रेंडली गणेश मूर्ती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेसाठी प्रशालेच्या मुख्याध्यापिका संगीता गोटे, रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईट प्रेसिडेंट वेंकटेश सोमाणी, सेक्रेटरी संदीप कुलकर्णी, जॉइंट सेक्रेटरी राहुल डांगरे, संगमेश्वर चित्रकला महाविद्यालयाचे प्रा. माशाळे आणि सिध्देश्वर कन्या प्रशालेचे कला विभाग प्रमुख मोटगी तसेच प्रशालेचे ज्येष्ठ शिक्षक प्रभू कांबळे उपस्थित होते. इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनींकरीता इको फ्रेंडली गणेश मूर्ती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली. माशाळे सर यांनी गणपती मूर्ती तयार कशी करायची याचे प्रात्यक्षिक दाखवले. त्यांच्या मार्गदर्शनाने दहावीच्या विद्यार्थिनींनीकडून सुंदर अशा इको फ्रेंडली गणपती मूर्ती तयार करून घेण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रशालेच्या सुरपुरे यांनी केले.

## शिवसेना ठाकरे गटाची उद्या सांगोल्यात बैठक

✔ **सांगोला** : माढा लोकसभा मतदारसंघातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाची प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांची बैठक सांगोला येथे आयोजित केले असल्याची माहिती तालुकाप्रमुख सूर्यकांत घाडगे यांनी दिले आहे. सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ, जिल्हा प्रमुख संभाजी राजे शिंदे, कैलास चव्हाण सांगोला विधानसभा संपर्कप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली माढा लोकसभा मतदारसंघातील सांगोला तालुक्यातील शिवसेनेचे व युवा सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करून सांगोला मतदार संघातील होऊ दे चर्चा या कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यासाठी पक्षाचे माढा लोकसभा मतदारसंघाचे निरीक्षक राहुल चव्हाण पाटील हे उपस्थित राहणार आहेत. शिवसेनेचे पदाधिकारी, युवासेनेचे पदाधिकारी, महिला आघाडी व कार्यकर्त्यांनी सांगोला शहरातील सदानंद हॉटेल, मिरज रोड येथे शुक्रवार दिनांक १५ सप्टेंबर रोजी दुपारी ठीक ४ वाजता सर्वांनी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन शहर प्रमुख कमरुद्दीन खतीब याने केले आहे.

## सज्जाद तांबोळी यांचे निधन



✔ **सांगोला** : सांगोला शहरातील सज्जाद कादरभाई तांबोळी वय ३९ यांचे मंगळवार दि. १२ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन भाऊ, तीन मुली असा परिवार आहे. सांगोला शहरातील पान तंबाखूचे व्यापारी कादर तांबोळी यांचे ते चिरंजीव होत.

# डेंग्यूचे रूग्ण आढळल्याने महापालिका सतर्क

## विविध ठिकाणी फवारणी सुरू

✔ सुराज्य/सोलापूर



शहर आणि परिसरात डेंग्यूचा फैलाव सुरू झाला आहे. १० संशयित रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे महापालिका सतर्क झाली असून प्रशासनाच्या वतीने विविध प्रभागात दौरे, फवारणी, धुवारणीचे काम सुरू आहे.

पावसाने विश्रांती घेतली असली तरी राज्यात विविध साथीच्या आजाराने आता डोकेवर काढले आहे. महापालिकेच्या शहर व हद्दवाढ भागात कार्यरत असलेल्या नागरी आरोग्य केंद्राच्या माध्यमातून सर्वेक्षण सुरू आहे.यामध्ये डेंग्यूचे १० तर चिकन गुनियाचा एक रूग्ण आढळला आहे. न्यू पाच्छा पेठ, होटगी रोड, विजापूर रोड, रामवाडी, हद्दवाढ भागात परिसरात डेंग्यूचे संशयित रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे महापालिकेने सर्तकता म्हणून या भागात धुवारणी, फवारणीचे काम सुरू केले आहे. शहराला तीन ते चार दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना पाणीसाठा करावा लागत असल्याने डेंगू शहरात वाढण्याचा धोका वाढला आहे. नागरिकांनी पाणी उकळून घ्यावे असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. ज्याठिकाणी डेंग्यू सदृश्य रुग्ण आढळत आहेत, त्या ठिकाणी सर्वेक्षण करत महापालिकेची आरोग्य यंत्रणा कार्यान्वित झाली आहे.

> **तपासणी करा, काळजी घ्याः डॉ. लोहारे**
>
> डेंग्यू, चिकन गुनिया या आजाराची लक्षणे आढळल्यास महापालिका दवाखान्यात जाऊन तपासणी करा, महापालिकेच्यावतीने फवारणीचे काम सुरू आहे. मात्र नागरिकांनी काळजी घेणे आवश्यक आहे, असे पालिका आरोग्य अधिकारी डॉ. बसवराज लोहारे यांनी सांगितले.

# पापय्या तालमी संघामध्ये लघुरूद्राभिषेक, होमहवन

## श्रावण मासनिमित्त महाप्रसादाचेही वाटप

✔ सुराज्य/सोलापूर

जुनी मिल मैदानातील पापय्या तालीम संघातील श्री हनुमंतास श्रावण मासनिमित्त लघुरुद्राभिषेक करून होम हवन सोहळाही मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ व्यवहारे,उपाध्यक्ष जयंत मोरे,सचिव प्रदीप शिर्के ,गणेश कुलकर्णी ,गजानन लामकाने, बंडू कदम, प्रकाश सुरवसे,शिवाजी चटके,विजय पाटील ,सूर्यकांत भगत, अक्षय कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.या कार्यक्रमाचे पौरोहित्य आचार्य संजय जोशी व ब्रह्मवृंदानी वेदोक्त मंत्रोच्चारात करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या सोहळ्यात परशुराम कोळी, राजकुमार माचकनूर, ॲड. प्रवीण निकम, संजय हिरळीकर, प्रदीप जाधव, प्रवीण सुरवसे, कन्हैया मुक्ता,शुभम घोरपडे,प्रथमेश पडवळक,ओंकार कोडगळे, राम भोसले, शरद येच्चे,अथर्व येच्चे, हृषिकेश चव्हाण,जितेंद्र गुरबानी, संभाजी मळगे,श्रेयस सपली,युग वानकर,अतुल कोथिंबीरे,विकेश गायकवाड, सुहास माने,रणजीत खताळ,श्रीनिवास कोटा ,गणपत माने यांच्यासह दररोज तालमीला येणारे पैलवान व भाविक उपस्थित होते. दरम्यान, विधिवत पूजाविधी पार पडल्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले. त्याचा शेकडो भाविकांनी लाभ घेतला.

# अधिकारी बेफिकीर तर सरकारची बघ्याची भूमिका : खुपसे पाटील

✔ सुराज्य/सोलापूर

शेतकऱ्यांना दिलासा मिळावा या दृष्टिकोनातून सरकारने अद्याप पाऊल उचलले नाही. सरकारला म्हणावा तसा दुष्काळ पडलेला दिसत नसल्याचे अधिकारी सांगत आहेत. त्यामुळे अधिकारी बेफिकीर तर सरकार बघ्याची भूमिका घेत आहे. त्यामुळे सरकारला जाग आणण्यासाठी जनशक्ती संघटना ताकदीनिशी लवकरच रस्त्यावर उतरणार असल्याचे जनशक्ती शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अतुल खुपसे पाटील यांनी सांगितले.

जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांची वीज बिल माफ करा, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या, उजनीतून शेतकऱ्यांसाठी पाणी सोडा यासह इतर मागण्यासाठी अतुल खूपसे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जनशक्ती शेतकरी संघटनेचे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाहेर आंदोलन होते. मात्र आंदोलन करण्यापूर्वीच या संदर्भात आपण बैठक लावून असा निरोप आणि विनंती पोलिसांनी केली. त्यानुसार बैठकीसाठी संघटनेचे पदाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचले असता एक जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी नसल्याने बैठक निष्फळ ठरली.

यावेळी संपर्क प्रमुख रेश्मा राऊत, विनिता बर्फे, शर्मिला नलवडे, गणेश वायभासे, बिभीषण शिरसट, विठ्ठल मस्के, केशव लोखंडे, विशाल पाटसकर, भारती पाटसकर, वैष्णवी गावडे, निखिल नागणे, रुक्मिणी शिंदे, दिलीप लोंढे, उर्मिला कोळी, रेश्मा दिवे, श्रावणी दिवे, वैशाली गावडे, अविनाश कदम आदी पदाधिकारी उपस्थित होते.


## दैनिक सुराज्यच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!




## ॥ भुमीपूजन समारंभ ॥

- शेगांव ते मुंढेवाडी ३.०० कि.मी. रस्ता सुधारणा करणे
  रक्कम रू.१४७.०० लक्ष
- केगांव खुर्द ते मुंढेवाडी २.०० कि.मी.रस्ता सुधारणा करणे
  रक्कम रू.११०.०० लक्ष
- शेगांव ते मुंढेवाडी ४.०० कि.मी.रस्ता सुधारणा करणे
  रक्कम रू.३०४.०० लक्ष

कार्यान्वयीन यंत्रणा
सार्वजनिक बांधकाम विभाग,सोलापूर

- तडवळ ते म्हैसलगी ५.०० कि.मी. रस्ता सुधारणा करणे
  रक्कम रू.३६४.०० लक्ष

कार्यान्वयीन यंत्रणा
मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, सोलापूर


# मुलींनी व महिलांनी कोणत्याही दुखण्याकडे दुर्लक्ष करू नये: डॉ. सारडा

## बुर्ला महाविद्यालयात सॅनिटरी नॅपकिन वाटप

✔ सुराज्य/सोलापूर



मुलींनी व महिलांनी पोटाच्या आणि कोणत्याही दुखण्याकडे दुर्लक्ष करू नये असे प्रतिपादन सोलापूरातील प्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूती शास्त्रज्ञ डॉ. किरण सारडा यांनी केले.

सोलापूर हायप्लायर्स राऊंड टेबल ३०९, ए. आर. बर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने बुर्ला महाविद्यालयातील किशोरवयीन मुलींकरिता सॅनिटरी नॅपकिन वाटप व मासिक पाळीतील स्वच्छता, सॅनिटरी नॅपकिनचे महत्व या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. सारडा बोलत होत्या. अध्यक्षस्थानी ए. आर. प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी हे होते.

यावेळी व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंगचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, एरिया चेअरमन ए १५ तरंग शहा, सोलापूर हायप्लायर्स राऊंड टेबल ३०९ चे चेअरमन रोहित राठी, एच. टी. हॉनररी टॅबलर रोहन शालगर, बुर्ला महाविद्यालयाच्या डायरेक्टर फिजिकल एज्युकेशन डॉ. रजनी दळवी, डॉ. नेहा राठी, प्रिया मालाणी, क्याती शहा, श्वेता कोठारी, अंकिता गाला, कल्याणी नागावकर, प्रा. डॉ. बनसोडे मॅडम युवा प्रतिनिधी ऐश्वर्या सावंत आदी उपस्थित होते. प्राचार्य. डॉ. अशोक एक्कलदेवी यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे स्वागत डॉ. नेहा राठी यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. रजनी दळवी यांनी केले. आभार प्रा. डॉ. आयेशा रंगरेज यांनी मानले तर सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM TENDER NOTICE**

| Sr. No. | Tender No. | Tender Details | Tender / Enquiry RFx No. | Amount | EMD | Tender Fee | Tender Publication Date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/EHV/ O&M/SUR/ SRM/T-16/ 2023-24 | SRM Tender for the Work of Providing & Fixing of Composite Insulated Cross Arm (CICA) Solution for Ground Clearance Improvement of Existing 132KV Jeur-Kurduwadi TSS SCSC Line Location No. 126 & 127 under Jurisdiction of Trans O&M Division, Solapur. | RFx No. 7000028529 | Rs. 17,16,820/- Including Taxes | Rs. 17,200/- | Rs. 525/- Including GST | From 12.09.2023 @ 09:00 Hrs to 19.09.2023 Up to 18:00 Hrs |

For more details, please visit SRM website **www.mahatransco.in** or **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Details :** Add'l Executive Engineer - 7447441096, Dy. Executive Engineer - 7447441043

Sd/-
Executive Engineer
EHV O&M Division, Solapur

# उपलेखापालपदी सेवाजेष्ठतेनुसार कायम कर्मचाऱ्याची नियुक्ती कधी करणार?

## कंत्राटीचा हट्टहास नेमका कशासाठी ? उलटसुलट चर्चेला उधाण

✔ सुराज्य/सोलापूर

मुख्यलेखापाल कार्यालयाकडील महत्वाच्या उपलेखापाल या पदाचा अतिरिक्त पदभार कंत्राटी पद्धतीवर महापालिकेच्या राष्ट्रीय शहरी आरोग्य मिशन ( एन.यु.एच.एम.) कडे सिटी अकाउंट मॅनेजर सिध्देश्वर बोरगे यांच्याकडे सोपविण्यात कुणाचे अभय आहे ? आस्थापनेवरील कर्मचारी उपलब्ध असताना सेवाज्येष्ठता डावलून अशा पद्धतीने कंत्राटी पद्धतीवरील कर्मचाऱ्यास या महत्त्वाच्या पदावर नियुक्ती देण्याचा हट्टहास नेमका कशासाठी ? उपलेखापालपदी सेवाजेष्ठतेनुसार कायम कर्मचाऱ्याची नियुक्ती कधी करणार ? यासह अनेक प्रश्न उपस्थित होत असून उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. निवेदन देऊनही नियुक्ती रद्द करण्यात न आल्याने कामगार संघटनांमधून संताप व्यक्त होत आहे.

महापालिका मुख्यलेखापाल कार्यालयाकडील उपलेखापाल श्रीमती आर.सी. साळुंखे यांची दि. ३१ जुलै २०२३ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर



स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर करण्यात आल्याने या पदाचे कामकाज अन्य सेवकाकडे सोपविण्याचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. या प्रस्तावास अनुसरुन उपायुक्त विद्या पोळ यांनी उपलेखापाल या पदाचे कामकाज सिटी अकाउंट मॅनेजर बोरगे यांच्याकडे सोपविण्याबाबत शिफारस केली. त्यानंतर बोरगे यांच्याकडे उपलेखापाल या पदाचे काम सोपवले. त्यांच्याकडील स्वतःच्या पदाचे काम पाहून मुख्यलेखापाल कार्यालयाकडील उपलेखापाल या पदाचे अतिरिक्त कामकाज पुढील आदेश होईपर्यंत सोपविण्यात आले आहे. विशेष म्हणजे महापालिका तत्कालीन सहाय्यक आयुक्त पुष्पगंधा भगत यांनी दि.१८ ऑगस्ट २०२३ रोजी याबाबतचे कार्यालयीन आदेश काढले. इतरही कर्मचारी सेवा ज्येष्ठतेनुसार या विभागात उपलब्ध असताना मानधनावरील कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची घाई का केली असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, कामगार संघटनांमधून संताप व्यक्त करत ही नियुक्ती रद्द करून सेवा जेष्ठतेनुसार मुख्या लेखापाल विभागातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी ही अशी मागणी यापूर्वीच निवेदनाद्वारे कामगार संघटनांनी केली आहे. तरीही अद्याप या मागणीवर कार्यवाही करण्यात आली नाही. यामुळे संताप व्यक्त होत आहे.

### अन्यथा सोमवारी आंदोलन करावे लागेल : जानराव

महत्त्वाच्या विभागात मानधनावरील सेवक घेणे ही गंभीर बाब आहे. बोरगे या कंत्राटी मानधनावरील सेवकाची नेमणूक करणारा कोण ? याची कसून चौकशी होऊन त्याच्यावर कडक कारवाई व्हावी यासाठी यापूर्वीच निवेदन देण्यात आले आहे मात्र अद्यापही कार्यवाही करण्यात आली नाही. हा हट्टाहास कशासाठी असा सवाल उपस्थित करत येत्या सोमवारी किंवा मंगळवारी या मागणीसाठी आंदोलन करावे लागेल, असा इशारा कामगार नेते अशोक जानराव यांनी दिला आहे.

### तर्क- विर्तकांना उधाण

बोरगे यांच्या नियुक्तीनंतर महापालिका वर्तुळात आश्चर्य व्यक्त करण्यात आले. कंत्राटी पद्धतीवरील एका कर्मचाऱ्यास मुख्य लेखापाल या महत्त्वाच्या विभागात उपलेखापाल या पदावर अतिरिक्त पदभाराची नियुक्ती करणे कितपत योग्य आहे ? ही नियुक्ती नियमानुसार झाली आहे का? कंत्राट पद्धतीवर कर्मचाऱ्यास आर्थिक विभाग असलेल्या या मुख्य कार्यालयात अतिरिक्त पदभार देण्याचा निर्णय कोणत्या हेतूने घेण्यात आला ? असाही सवाल उपस्थित होत आहे.



## यशवंतनगरच्या महर्षि शाळेतील शिक्षकांचा 'राष्ट्रनिर्माण' पुरस्काराने गौरव

✔ **माळीनगर** : शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित - महर्षि शंकरराव मोहिते प्रशाला प्राथमिक विभाग यशवंतनगर ता. माळशिरस येथील २ शिक्षकांना राष्ट्रनिर्माण पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. त्याचप्रमाणे प्रशालेतील आकाश दत्तात्रय कदम यांना रोटरी क्लब ऑफ सराटी डिलाईट यांच्यावतीने राष्ट्रनिर्माण पुरस्कार पुण्याच्या डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मंजू फडके यांच्या हस्ते, अध्यक्ष अनिल जाधव, विलास शिंदे यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. यामध्ये सहशिक्षक महादेव बापू राजगुरू यांना इनरव्हील क्लब अकलूज यांच्या वतीने राष्ट्रनिर्माण पुरस्कार सत्यप्रभादेवी रणजितसिंह मोहिते पाटील व अभिनेते मिलिंद गुणाजी यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी इनरव्हील क्लबच्या डिस्ट्रिक्ट चेअरमन मुक्ती पानसे व इनरव्हील क्लब अकलूजच्या अध्यक्षा डॉ. श्रद्धा जवंजाळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. आकाश कदम सर यांची आत्तापर्यंत १२ वर्षे सेवा झाली आहे. त्यांनी विविध स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांना सहभागी करून यशस्वी केले आहे. मंथन, सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशन, पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा, एम टी एस परीक्षा अशा स्पर्धा परीक्षांमध्ये त्यांचे विद्यार्थी जिल्हा व राज्यस्तरावर यशस्वी झाले आहेत. त्याचबरोबर विविध सांस्कृतिक कार्यक्रम, वक्तृत्व स्पर्धा, राज्यस्तरीय लेझीम स्पर्धा,समुहनृत्य स्पर्धामध्ये प्रथम क्रमांकाचे स्थान आपल्या विद्यार्थ्यांना मिळवून दिले आहे.आपल्या शैक्षणिक जीवनात नावीन्यपूर्ण प्रयोग करणे व उपक्रम राबविणे याची आवड कदम सर यांना आहे. या पुरस्काराबद्दल राजगुरू व कदम यांचे शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, संचालिका व सभापती स्वरूपाराणी मोहिते-पाटील , सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील, मुख्याध्यापक शिवाजी पारसे यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.



## खांडवीच्या जिजाऊ गुरूकुलचे तालुकास्तरीय स्पर्धेत यश

✔ **बार्शी** : खांडवीच्या जिजाऊ गुरूकुलच्या विदयार्थ्यांनी तालुकास्तरीय कुस्ती तसेच मैदानी खेळात उत्कृष्ट यश मिळवले. तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत खांडवीच्या जिजाऊ गुरुकुलची विद्यार्थिनी मृण्मयी गपाट हिने १७ वर्ष वयोगटात तर कृष्णा गव्हाणे-१४ वयोगटात दुसरा क्रमांक मिळवून बाजी मारली. अर्णव इंग्लिश मीडियम स्कूल वैराग येथे या स्पर्धा झाल्या. तसेच शिवशक्ती मैदान बार्शी येथे घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय रनिंग स्पर्धेत तब्बल ४० विद्यार्थ्यांनी बाजी मारली. १४ वर्ष वयोगटात अनुक्रमे- १००, २००, ४००, ६०० मीटर गौरव धालगडे, अथर्व गाढवे, श्रेयस बामणकर, १७ वयोगटात अनुक्रमे-२००, ४००, ६००, ८००, १५००, ३००० मीटर मध्ये ओंकार बेलदार, कृष्णा फंड, आर्यन गायकवाड, सागर गटकळ, आर्यन मंडलिक, १९ वयोगटात अनुक्रमे ४००, ८०० मीटर मध्ये ओंकार मुरकुटे, अविनाश गोडगे याचबरोबर, १४ वयोगट थाळीफेक-आर्यन गायकवाड, १७ वयोगट - ५ हजार मीटर चालणे यात शुभम खैरे, १०० बाय ४०० मीटर रिले- ओंकार बेलदार, सागर गटकळ, अजिंक्य गायकवाड, सार्थक पाटील, ४०० बाय ४०० रिले -ओंकार बेलदार, रोहित जगदाळे, अक्षय शेंबडे, रोहित लिमकर तसेच १४,१७,१९ वयोगटात अनुक्रमे ८०,१००,४०० मी.हार्डल मध्ये श्रेयस बामणकर, सागर गटकळ, ओम पाटील, अक्षय शेंबडे (द्वितीय) १७,१९ वयोगट हातोडा फेक-व्यंकटेश गायकवाड, राजनंदिनी रोहिदास घोलप यांनी यश मिळवले. या सर्व विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर निवड झाली आहे. विदयार्थ्यांना प्रशिक्षक म्हणून जे. बी. शिंदे, वैभव खंदारे, गणेश वडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.



## माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या हस्ते एकता बनसोडेचा सत्कार

✔ **अक्कलकोट** : तालुक्यातील कोन्हाळी येथील एकता बाबुराव बनसोडे लंडनला उच्च शिक्षणासाठी जाणार असल्याने माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी शुभेच्छा दिल्या. माजीमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या हस्ते कुमारी एकता बनसोडे हिचा रविवार दिनांक १० सप्टेंबर रोजी कोन्हाळी गावात सत्कार करण्यात आला. यावेळी माजी जि. प . सभापती मल्लिकार्जुन पाटील , विलास गव्हाणे , सिद्धार्थ गायकवाड , वंचित बहुजन आघाडीचे ता . अध्यक्ष चंद्रशेखर मडिखांबे , विशाल ठोंबरे , दुधनी बाजार समिती सदस्य इरण्णा दसाडे ,उप सरपंच प्रतिका बनसोडे , माजी सरपंच सुमित्रा बनसोडे, बाबूराव बनसोडे , सुभाष बगले - पाटील चेअरमन , बसवराज बनसोडे व्हा चेअरमन , सिद्धाराम जाधव , स्वामी मडोळप्पा बिराजदार तंयमुक्त अध्यक्ष , अप्पाशा ढब्बे , मलकप्पा माळी , भिमराव बनसोडे , हुसेनी बनसोडे , विजय गायकवाड उपसरपंच बॅगेहळी , एड. अमोल बनसोडे , पोलीस पाटील बनसोडे आदी सह महिला वर्ग गावकरी मोठया संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी मल्लिकार्जून पाटील , चंद्रशेखर मडिखांबे यांनी मनोगत व्यक्त करून कुमारी एकता बनसोडेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी कुमारी एकता बनसोडे चा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

## गणेशमूर्तींचे रंगकाम अंतिम टप्प्यात; मूर्तींचे साहित्य २० ते २५ टक्क्यांनी महागले

✔ सुराज्य/नातेपुते

गणपती उत्सवाला सहा दिवस बाकी आहेत. मूर्तिकारांचे मूर्ती रंगकाम अंतिम टप्प्यात असुन पूर्ण होत आले आहे. उत्सवासाठी मंडळ समिती गठीत करण्याची लगबग सुरू आहे. मूर्ती तयार करण्याच्या साहित्यात २० ते २५ टक्के वाढ झाल्यामुळे गणेशोत्सवावर महागाई व पाऊस न पडल्याने दुष्काळाचे सावट आहे.



तरीही गणेश भक्तांची लगबग सुरू आहे.यंदा सुरुवातीला पावसाळा लांबला. जुलै व ऑगस्ट कोरडा गेल्यामुळे तालुक्यावर दुष्काळाचे सावट आहे. मात्र वर्षाचा उत्सव असल्याने युवक वर्गात श्रीगणेश स्थापनेसाठी लगबग सुरू झाली आहे.

मूर्ती तयार करण्याच्या साहित्यात वाढ यावर्षी प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या किमतीत एका गोणीमागे वीस रुपयांची वाढ झाली आहे. नारळ, दोरीत शंभर, रंगांच्या किमतीत वीस टक्के तर मजुरीत पन्नास रुपयांची वाढ झाली. यामुळे गणपती मूर्तींच्या किमतीत वीस टक्यांहून अधिक वाढ झाली आसल्याचे मूर्तिकार अमित कुंभार यांनी माहिती देत असताना सांगितले.आहे. गणेशमूर्ती तयार करण्याचे काम नातेपुते शहरात अमित, आर्ट, स्वप्निल आर्ट तसेच अनेक ठिकाणी कुंभार समाजातील मूर्तिकार यांनी अनेक प्रकारच्या वेगवेगळ्या रूपातील गणेश मूर्ती तयार करण्यात आलेल्या आहेत.

## अशोक चौक आणि सिद्धेश्वर पेठ परिसरात अतिक्रमण विरोधात कारवाई

✔ सुराज्य/सोलापूर

शहरातील गजबजलेल्या अशोक चौक आणि सिध्देश्वर पेठ परिसरात महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत चार चाकी तीन गाड्या आणि पत्रे जप्त करण्यात आले.

सोलापूर महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येत आहे. बुधवारी दोन ठिकाणी कारवाई करण्यात आली. दुपारी अशोक चौक परिसरात वालचंद





कॉलेज जवळील रस्त्यावर रहदारीस अडथळा ठरणाऱ्या चार चाकी तीन गाड्या जप्त करण्यात आल्या. तसेच फुटपाथ वर हिरवे कापड मारून केलेला आडोसा निष्काशीत करण्यात आला. त्यानंतर पुढे सिद्धेश्वर पेठ बीफ मार्केट येथे अनधिकृतपणे ठेवण्यात आलेले पत्रे या पथकाने जप्त केले. महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने शहरात सर्वत्र रहदारीस अडथळा ठरणारे तसेच फुटपाथ वरील व इतर अतिक्रमणे काढण्याची मोहीम नियमितपणे चालू आहे. नागरिक व व्यापाऱ्यांनी कटू कारवाई टाळण्यासाठी नियम पाळावेत अन्यथा कारवाई करण्यात येईल, असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे.



## श्रीसंत सेना महाराज पुण्यतिथी उत्सव विविध उपक्रमांनी साजरा

✔ सुराज्य/अक्कलकोट

येथील श्रीसंत सेना महाराज नाभिक समाज बहुउद्देशीय संस्था संचलित श्रीसंत सेना महाराज पुण्यतिथी उत्सव विविध उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. रविवारी आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते श्रीसंत सेना महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, सायं.७ वा.हनुमान भजनी मंडळ बणजगोळ यांचा भजन, रात्री १०.वा. देविदास जगताप, दिनकर अवताडे, एकनाथ शिंदे यांचा जुगलबंदी भारुडाचा जागर कार्यक्रम संपन्न झाला.

सोमवारी सकाळी ९ वा.ह.भ.प.किर्तनकार अरुंधती गवळी यांचा किर्तनाचा कार्यक्रम, तद्नंतर विक्रमवीर रक्तदाते अभिजीत लोके यांच्या हस्ते रक्तदान शिबीराचे शुभारंभ, दु.१२.०५ मि. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुलालाचा कार्यक्रम झाला. याप्रसंगी प्रभाकर सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबिर आयोजन केले होते. यादरम्यान सुमारे ६० जन रक्तदाते रक्तदान केले.

यावेळी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, रासपचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुनिल बंडगर, माजी उपनगराध्यक्ष यशवंत धोंगडे, महेश हिंडोळे, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, नागु कुंभार, शुभम मडिखांबे, माजी नगरसेविका ज्योती जरीपटके, नाभिक महामंडळ प्रदेश उपाध्यक्ष शिवाजी जमदाडे, पो.ना.नाईकवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

यावेळी शहर अध्यक्ष लक्ष्मण विभुते, उपाध्यक्ष राजेश कोरे, सचिव महेश सुरवसे, खजिनदार प्रविण राऊत, पंच पद्माकर डिग्गे, सुदर्शन विभुते, प्रभाकर सुरवसे, भागवत विभुते, सोमनिंग सुरवसे, नाभिक समाज ता.अध्यक्ष शिवशरण सुरवसे, श्रीशैल सुरवसे, व्यंकट विभुते, अनिल वाघमारे, सुमित डिग्गे, काशिनाथ विभुते, जगन्नाथ वाळके, दादा वाळके, हरी राऊत, संदीप राऊत, अमर सुरवसे, आकाश सुरवसे, निरंजन क्षीरसागर, किरण भाले, महादेव भाले, महेश घाटे, गणेश डिग्गे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सुभाष सुरवसे तर आभार शिवशरण सुरवसे यांनी मानले.

## शिक्षक सहकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर

### कोषाध्यक्षपदी नेहरू राठोड यांची निवड

✔ सुराज्य/सोलापूर

शिक्षक सहकार संघटनेच्या सोलापूर जिल्हा कोषाध्यक्ष पदी नेहरू राठोड व उत्तर सोलापूर संपर्क प्रमुख पदी विश्वनाथ राठोड सर व दक्षिण सोलापूर तालुका प्रसिध्दी प्रमुख पदी श्रीकृष्ण आर्दीच्या सहनिवडी करण्यात आल्या.

सोलापूर येथे झालेल्या सहविचार सभेत निवड करण्यात आली. यावेळी सोलापूर जिल्हाध्यक्ष रविराज खडाखडे,महिला जिल्हाध्यक्ष सुवर्णा गाडे,जिल्हा सचिव सचिन निरगिडे, जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र जेटगी,राज्य संघटक विठ्ठल टेळे, दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष सिद्धाराम कोळी,तालुका सचिव सोमलींग बिराजदार,उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष राजेंद्र पडदुणे,तालुका सचिव सत्यनारायण नडीमेटला,दीपक कांबळे,श्रीमंत कोळी, यल्लाप्पा विटकर,तानाजी व्हनमाने, बळवंतराव आदी उपस्थित होते.नुतन पदाधिकाऱ्यांनी बोलताना सांगितले की, शिक्षक सहकार संघटनेमुळे आमच्या परजिल्ह्यातून स्वजिल्हयात बदल्या झाल्या. त्यामुळे शिक्षक सहकार संघटनेशी ध्येय धोरणानुसार काम करणार आहोत. नुतन पदाधिकाऱ्यांचे राज्याध्यक्ष संतोष पिट्टलवाड, राज्य सरचिटणीस निलेश देशमुख,राज्य कार्याध्यक्ष दीपक परचंडे,पुणे विभागीय अध्यक्ष संजय दवले,जिल्हा संपर्कप्रमुख सुमंत मुंडे,जिल्हा संघटक सुनील पवार,बार्शी तालुकाध्यक्ष बजरंग कोळी,जिल्हा संघटक विशाल नाईक, माढा तालुकाध्यक्ष शिवाजी कदम, राहुल कांबळे,गणेश नागणसूरे, नागनाथ बिराजदार आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

## देगाव येथे २ मोबाईल दुकान फोडले; दीड लाखाचे मोबाईल गायब

✔ **सोलापूर** : देगाव (ता.पंढरपूर) येथे एका रात्री चोरट्यांनी दोन मोबाईलचे दुकान फोडून एका दुकानातील दीड लाख रुपये किमतीचे मोबाईल पळविले .ही चोरी काल मंगळवारी पहाटेच्या सुमारास घडली. यासंदर्भात शाहरुख मौला मणेरी (रा. देगाव) यांनी पंढरपूर शहर पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलीसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

देगाव येथील शहा पेट्रोल पंप ते चप्पल लाईन या दरम्यान मणेरी यांचे एम.एस. मोबाईल शॉपी नावाचे दुकान आहे. तर त्यांच्या शेजारी महेश साळुंखे यांचे देखील तसेच दुकान आहे. काल पहाटेच्या सुमारास दोन्ही दुकानाच्या शटरचे कुलूप चोरी झाली. त्यात मणेरी यांच्या दुकानातून विविध कंपन्यांचे १७ ते २० नवीन मोबाईल आणि इतर साहित्य चोरीस गेले. तर साळुंखे यांच्या दुकानातून कितीचा माल गेला हे समजले नाही. पुढील तपास फौजदार भागवत करीत आहेत.

## झाडबुके महाविद्यालयाच्या ७ विद्यार्थ्यांची निवड

✔ **बार्शी** : तालुकास्तरीय स्पर्धेत यश मिळवलेल्या श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविदयालयाच्या किरण अनपट, अशोक धोत्रे, करण लोकरे, आर्य फासे, ऋषीकेश कांबळे, स्नेहल सुरवसे, आयशा अरब यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाने शिवशक्ती मैदानावर घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये घवघवीत यश मिळविले आहे. तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत धावणे ८०० मीटर मध्ये किरण अनपट याने प्रथम क्रमांक मिळवला. १५०० मीटर मध्ये अशोक धोत्रे प्रथम. ३००० मीटर मध्ये किरण अनपट प्रथम तर करण लोकरे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. १०० मीटर मध्ये अशोक धोत्रे याने तृतीय क्रमांक मिळविला. थाळीफेक मध्ये आर्य फासे याने प्रथम क्रमांक मिळवला तर गोळाफेक मध्ये ऋषिकेश कांबळे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. मुलींमध्ये स्नेहल सुरवसे हिने २०० मीटर धावण्यामध्ये द्वितीय क्रमांक मिळविला तर गोळा फेक मध्ये आयशा अरब हिने द्वितीय क्रमांक मिळविला. क्रीडा स्पर्धेमध्ये क्रमांक मिळविलेल्या सर्व खेळाडूंची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या सर्व खेळाडूंना क्रीडाशिक्षक गणेश नाकाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

## विश्वाच्या कल्याणासाठी भारत जगद्गुरु बनावा : प्रा. स्वामी

✔ सुराज्य/सोलापूर

११ सप्टेंबर १८९३ रोजी शिकागो येथील सर्वधर्म परिषदेत स्वामी विवेकानंद यांनी जगाला विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. हा दिवस विवेकानंद केंद्राकडून विश्वबंधुत्व दिवस म्हणून साजरा केला जातो. विश्वाच्या कल्याणासाठी भारत जगद्गुरु बनावा, हे स्वप्न स्वामी विवेकानंद यांनी पाहिले होते. तसे ते साकार होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला होता. तसेच आज भारत कशाप्रकारे त्या दिशेने वाटचाल करीत आहे, हेही प्रमुख वक्ते प्रा. प्रशांत स्वामी यांनी सोदाहरण स्पष्ट केले.



हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स आणि विवेकानंद केंद्र कन्याकुमारी सोलापूर शाखेच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. १२) महाविद्यालयात विश्वबंधुत्व दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सत्यजित शहा होते.

ऐश्वर्या राजमाने यांनी युवा नेतृत्व विकसन उपक्रमाची माहिती दिली. तीन ओंकार आणि प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. अश्विनी नंदाल यांनी प्रार्थना म्हटली. महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. काळदाते यांनी प्रास्ताविक केले.

वैष्णवी पोगुल यांनी 'दिव्य तेज अंतरी आमुच्या..' हे गीत गायिले. गौरी येडके यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कृष्णा मुळे यांनी विवेकवाणी म्हटले. समृध्दी गवंडी यांनी सूत्रसंचालन केले. हरीश टवाणी यांनी आभार मानले. अश्विनी नंदाल यांनी म्हटलेल्या 'सर्वे भवंतु'ने कार्यक्रमाची सांगता झाली.

याप्रसंगी सृजल मोरे, अनिकेत डोके, मीनल गाजूल, ऋतिका गाजुल यांच्यासह मागील वर्षी युवा नेतृत्व विकसन उपक्रमाच्या माध्यमातून विवेकानंद केंद्राशी जोडले गेलेले महाविद्यालयीन युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

# यंदा बैलपोळ्यावर ‘लम्पी’चे सावट

## बाजारात दुकाने सजली मात्र साहित्य खरेदीकडे शेतकऱ्यांनी फिरविली पाठ

सुराज्य/सोलापूर

’वृषभराजा’चा पोळा सण ’बळीराजा’साठी सर्वांत महत्त्वाचा सण समजला जातो. अतिशय जिव्हाळ्याचा, पारंपरिक अन् लोकसंस्कृतीचा वारसा असलेला हा सण यंदा लम्पीचा प्रार्दुभाव आणि दुष्काळाच्या सावटाखाली दबला आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा बैलांच्या सजावटीसाठी लागणाऱ्या आवश्यक साहित्यांचे दर विस ते तीस टक्क्यांनी वाढले आहे. जिल्ह्यात विविध ठिकाणी भरलेल्या आठवडे बाजारात पोळ्यासाठी विविध साहित्याची दुकाने सजली असली तरी मागील वर्षाच्या तुलनेत दुकानदारासह खरेदीदारांची गर्दी जेमतेम असल्याचे चित्र पाहवयास मिळाले.

शेतकऱ्याचा खरा साथी बैल...याच बैलाच्या उपकारांची जाण ठेवत दरवर्षी बैल पोळा सण शेतकरी साजरा करतात. पण यंदाच्या पोळयावर दुष्काळाचं सावट आहे. अर्धा पावसाळा संपलाय तरी जिल्ह्यात समाधानकारक पाऊस नाही. माणसांना आणि जनावरांनाही पाणी मिळायला अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत. समाधानकारक पाऊस पडेल आणि आपल्याला भरपुर उत्पन्न होईल या आशेवर शेतकऱ्यांनी कर्ज काढलं पण पावसाने घात केला. त्यामुळे पोळा साजरा कसा करावा हाच प्रश्न आता शेतकऱ्यांना पडला आहे.

क्षदरवर्षी पोळा सणाला बैलांसाठी नवीन साहित्य खरेदी करून त्यांची सजावट करणाऱ्या शेतकऱ्यांनी महागाईमुळे बाजाराकडे पाठ फिरवून जुनेच साहित्य वापरण्याचा निर्णय घेतल्याने यंदा बाजारात थंड प्रतिसाद मिळत आहे. यंदा जिल्ह्यात जूनपासून गायब झालेल्या पावसामुळे खरिप पिकांची स्थिती नाजूक बनली आहे.

पंढरपूरच्या आठवडे बाजारात वेसण ४० ते ५० रुपये जोड, कासरा ८० ते २०० रुपये, मोरखी ५० ते १२५ रुपये, कवडी गेठा १०० रुपये, गोंडा ५० ते १५० रुपये, घागरमाळ जोडी एक हजार ते दीड हजार रुपये, भोरकडी ५० ते १०० रुपये जोडी, झुली दोन ते अडीच हजार रुपये, मोरक्या जोड ६० ते ११० रुपये तर हिंगुळ ५० ग्रॅमचा डबा पन्नास रुपये तर १०० ग्रॅमचा ८० रुपये प्रमाणे किमती असल्याचे पाहवयास मिळाले

**साजश्रृंगाराच्या सहित्याला शेतकऱ्यांकडून**



**अत्यल्प प्रतिसाद.**

मागील काही वर्षांपासून ट्रॅक्टरचा प्रत्येक कामांसाठी उपयोग वाढल्याने बैलांची संख्या झपाट्याने कमी होऊन सणाची व्यापकताही कमी झाली. त्यामुळे साजश्रृंगाराच्या सहित्याला परिणामी शेतकऱ्यांकडून अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याचे पाहायला मिळत आहे. यंदा पावसाने दडी मारल्याने पिकांची स्थिती नाजूक असून खरीप हंगामात केलेला खर्च पदरात पडणे कठीण आहे.अनेक शेतकरी उधारी-उसनवारी करून पोळा सणासाठी बैलजोडीच्या साजाची खरेदी करत आहेत. बैलांचे शेती व्यवसायात विशेष महत्त्व असल्याने ते शेतकऱ्यांचा सोबती म्हणून ओळखला जातो. शेतकऱ्यांसाठी त्यांचे बैल वर्षभर शेतात राबतात. त्यामुळे बैलांच्या ऋणातून उतराई होण्यासाठी पोळ्याच्या दिवशी बैलांची रंगरंगोटी व सजावट करून पूजा केली जाते. पोळ्याच्या पहिल्या दिवशी बैलांचे खांदे तूप व हळदीने मळणी केले जाते. बैलांना आंघोळ घालून त्यांना पुरणपोळी व नैवेद्य भरवला जातो. परंतु यंदा पाण्याचीच पंचाईत असून सर्वत्र जलसाठे कोरडे राहून बैलांना आंघोळ घालण्याचा प्रश्न उभा ठाकला आहे.



**मोडनिंब बाजारात खरेदीसाठी शेतकरीच नाही**

मोडनिंब : मोडनिंब बाजारात पोळ्यासाठी आवश्यक असलेल्या दावी दोरखंड, रस्सी, शेंब्या,लोकरी कंडे गोंडे, म्होरक्या, शिंगासाठी बेगुड,रंग, झुली,सामत्या,वेसनी,मण्या,माळा, भोरखडी, घुंगरी,साखळ्या घाटी इत्यादी सामानाची रेलचेल झाली होती.

पोळा किंवा बैलपोळा हा श्रावण अमावस्या किंवा भाद्रपद अमावास्या या तिथीला प्रदेशानुसार साजरा करण्यात येणारा बैलांचा सण आहे. बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा एक मराठी सण असून हा महाराष्ट्रात भव्य पातळीवर साजरा केला जातो, विदर्भातील सीमेवर असलेल्या मध्य प्रदेश व तेलंगण सीमाभागातसुद्धा हा सण साजरा होतो. ज्यांच्याकडे शेती नाही ते मातीच्या बैलाची पूजा करतात. श्रावणात पिठोरी अमावस्येला पोळा संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो असा सर्जा-राजाचा सण म्हणजे पोळा. मोडनिंब बाजारात पोळ्या साठी लागणाऱ्या साहित्याची खुपच आवक होती.बाजारात पांडुरंग लोखंडे, आशाबाई लोखंडे, बळी खंडाळे,साधु खंडाळे,आशोक खंडाळे, संगीता खंडाळे,सचिन लोखंडे, संदेश खंडाळे, सहदेव खंडाळे हे सर्व विक्रेते संतोष लोखंडे, सुहास लोखंडे.यांच्या सह तीस चाळीस दुकाने होती. बैलाची संख्या रोडावली आहे त्यामुळे शेतकरी संख्या कमी होती. सध्या शेतीचे यात्रीकीकरणाच्या युगात बैलजोडी संभाळणे बंद झाले आहे. दुधासाठी जर्सी गाई व म्हशी पाळतात. पुर्वी दावी दोरखंड कापूस, लोकरी ताग ज्युट याची असे., मोळ,म्होरक्यी चवरी,कंडे गोंडे हे हाताने बनवून घेतले जात पण आता सर्वच यंत्राने व क्रुत्रीम धागे यापासून बनवले जातात. नायलॉन, रेयॉन, रेशमी दोरे,प्लॅस्टिक यामुळे सध्या बाजारात अनेक साहित्य उपलब्ध आहे. पण पोळ्यासाठी

शेतकरी व बैलजोडी च नाही अशी अवस्था झाली आहे. आता जर्सी गाई व म्हशी याचीच सजावट उरल्याने बाजारात ग्राहक मात्र तुरळक होते.



## लवंग परिसरात गतवर्षीपेक्षा १० ते १५ टक्के दरवाढ

सुराज्य/माळीनगर

सर्जाराजाचा बैलपोळा साजरा करण्यासाठी लागणाऱ्या विविध साहित्याच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांनी बाजारात गर्दी केली आहे. गतवर्षीपेक्षा १० ते १५ टक्के दरवाढ बैलपोळा साहित्यामध्ये झालेली आहे. गुरुवारी बैलपोळा असल्यामुळे लवंग ता. माळशिरस परिसरातील दुकाने विविध साहित्याने सजली आहेत.

बैलपोळा आज साजरा होणार आहे. बैलांना व इतर जनावरांना सजविण्यासाठी तसेच त्यांच्या अंगावर घालण्यासाठी लागणारे झुल, घंटी, घुंगर, पैंजण आदी साहित्यांना आज मागणी होती. दोर, मोरकी, गोंडा, झुल, पितळीकडी, भोरकडी, घंटी पितळी, लोखंडी घंटी बाजारात उपलब्ध आहे.

बैलांना पारंपारीक पध्दतीने सजविले जाते. मात्र यंदा प्रथमच फॅन्सी प्लास्टीकच्या वस्तू बाजारात आल्या आहेत. त्यात विविध प्रकार आहेत. नवीन प्रकारात गोफ दहा प्रकारात आहे. याशिवाय पैंजणही आहे.

परंतु यावर्षी दुष्काळाचे सावट असल्यामुळे शेतकरी, पशुपालक व दुग्ध व्यावसायिक यांची आर्थिक गणिते जुळवताना तारांबळ उडताना दिसत आहे. अशात पुन्हा एकदा लंपी आजाराने डोके वर काढले आहे. तरीही प्रत्येक शेतकरी आजचा दिवस आनंदात साजरा करतोच.

गतवर्षीपेक्षा १० ते १५ टक्के दरवाढ बैलपोळा साहित्यामध्ये झालेली आहे. पावसामुळे जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे लोकांचा संमिश्र प्रतिसाद पाहायला मिळत आहे. सण तोंडावर आला तरीही लोकांची खरेदीसाठी अजूनही म्हणावी अशी गर्दी नाही.

**– युवराज भिलारे** (दुकानदार)

यंदा जास्त पाऊस न पडल्याने दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. तशातच बैलपोळ्याच्या साहित्य किंमतीत वाढ झाल्याने आर्थिक अडचणीला देखील सामोरे जाण्याची वेळ आली आहे. नाही म्हटलं तरी दुधाचे दर, पाऊस, लंपी आजार या साऱ्यांचा परिणाम बैलपोळ्याच्या सणावर पडलेला आहे.एखाद्या जनावराचे काही नाही परंतु माझ्याकडे २५ शेळ्या व % जनावरे आहेत त्यामुळे यावर्षी आर्थिक गणित थोडे विस्कटले आहे.

**– लखन जाधव** (पशुपालक )



## लिटल हार्ट इंग्लिश स्कूल उपविजेता

**उ. सोलापूर** : युवक सेवा संचालनालय पुणे विभाग व जिल्हा क्रीडा अधिकारी सोलापूर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाठी येथील लिटल १४ वर्षे मुलीच्या संघ प्रथम आला. १४ वर्षे मुले यांनी उपविजेतेपद पटकवल्याने जिल्हा स्तरीयसाठी सोर्धेसाठी निवड झालेले हॉलीबॉल स्पर्धेसाठी खेळाडू पुढीलप्रमाणे- सोफिया मुलानी, राधिका मोटे, नामन्या राठोड, श्रेया जाधव, दिव्या माने, केतकी सराठे, श्रद्धा जाधव, सुहाना चव्हाण, दूर्वा भालेराव, श्रद्धा आवताडे, तनुजा ढावरे यांची निवड झाल्याने संस्थेचे अध्यक्ष- दिलीपरावजी माने, उपाध्यक्ष- पृथ्वीराज माने, सचिव- जयश्रीताई माने, कॅम्पस डायरेक्टर -प्रा राहुल माने, प्रभारी- प्राचार्य सतीश दहिटनकर, शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.क्रीडा शिक्षक गोकुळ यादव यांचे मार्गदर्शन मिळत आहे.

## गुळवंची गावच्या उपसरपंचपदी सुनंदा शिंदे यांची बिनविरोध निवड



**उ. सोलापूर** : उत्तर सोलापूर तालुक्यातील गुळवंची गावच्या उपसरपंचपदी सुनंदा शिवाजी शिंदे यांची बिनविरोध निवड निवडणूक निर्णय अधिकारी तथा ग्रामसेविका मनीषा शिंदे ह्यांनी केली.उपसरपंच सागर राठोड यांनी राजीनामा दिल्याने उपसरपंच पद रिक्त झाले होते. एकच अर्ज आल्याने बिनविरोध निवड करण्यात आली.यावेळी सरपंच तृप्ती पौळ, दिनेश जगताप, विष्णू भोसले,आरती इंगळे, ग्रामपंचायत सदस्य सुनिल जाधव, सागर राठोड,शिवसेना तालुका प्रमुख- संजय पौळ,तानाजी भोसले,महावीर भोसले,अनंत कोरके,शिवाजी शिंदे,चंद्रहास पवार,तानाजी शिंदे,दिनेश शिंदे,लक्ष्मण पवार,गणेश शिंदे, दत्तात्रय भोसले,सतिश जगताप,संजय आदाटे उपस्थित होते.



## श्रीसंतशिरोमणी सेना महाराज पुण्यतिथी साजरी

**वेळापूर** : वेळापुर ता. माळशिरस येथे नाभिक समाजाचे आरध्य दैवत संतश्रेष्ठ संतशिरोमणी श्री सेना महाराज यांची पुण्यतिथि साजरी करण्यात आली. यानिमित्ताने खंडोबा मंदिरा शेजारी , नागोबा मंदिरामध्ये संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन आणि आरती , वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव व वेळापुर सरपंच रजनीश बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आली , यावेळी नाभिक समाज संघटनेचे पदाधिकारी, राष्ट्रीय नाभिक संघटना माळशिरस तालुका अध्यक्ष राहुल सराटे, वेळापूर नाभिक संघटना शहराध्यक्ष प्रमोद साळुंखे, श्रीराम जाधव, मंगेश जाधव, दत्ता साळुंखे, दीपक साळुंखे, सचिन साळुंखे, जयसिंग राऊत, नवनाथ लोखंडे, विकी लोखंडे, किरण लोखंडे, अरुण लोखंडे, मोहन काशीद, दशरथ वाघमारे, अजय सराटे, विजय जाधव, मनोज जाधव, सतीश जाधव, नितीन साळुंखे,व नाभिक समाज बांधव, महिला भगिनी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूर जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करावा

## शेतकरी संघटना व बहुजन वंचित आघाडी यांची मागणी

सुराज्य/वेळापूर



चालू वर्षी पाऊस कमी पडल्यामुळे पूर्ण खरीप हंगाम वाया गेला आहे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची पिके पाणी नसल्यामुळे जळून गेली आहे जनावरांना खाण्यासाठी चारा नाही सरकारने अद्याप कोणतीही उपाययोजना केली नाही तरी जातांसाठी चारा डेपो उपलब्ध करून थोर मका कांदा या पिकासह २५ टक्के अग्रीम देण्यासंदर्भात आदेश दिला आहे . वास्तविक संपूर्ण खरीप हंगाम वाया गेलेला असताना त्यामध्ये खरी खरीप हंगामाचा समावेश होणे गरजेचे आहे चूर मका कांदा यांचा समावेश केला गेला तरी उडी मोड ही पिके वगळले आहेत तरी उडीद मोकळे यांचा २५ टक्के आगरीन रक्कम देण्यात यावी. सोलापूर जिल्ह्यामध्ये दुष्काळ जाहीर करण्यात यावा अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटना, रयत क्रांती संघटना व बहुजन वंचित आघाडी यासह शेतकरी व अनेक संघटनांच्या वतीने दुष्काळ जाहीर न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला.

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माढा लोकसभा अध्यक्ष कमलाकरताात्या माने देशमुख, बहुजन वंचित आघाडीचे गोपाळकाका घाडगे ,रयत क्रांती शेतकरी संघटनेचे राहुल बिडवे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष मदनसिंह जाधव, रयत क्रांती संघटनेचे आदित्य गरड आदी. उपस्थित होते.

जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात चाऱ्याचा व पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असून सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात पुष्काळ सावट दिसून येत आहे याचा विचार करून शासनाने लवकरात लवकर दुष्काळ जाहीर करावा अन्यथा शेतकरी रस्त्यावर उतरेल.

**– मदनसिंह जाधव**
(स्वाभिमानी शेतकरी संघटना जिल्हा उपाध्यक्ष)

## गुळवंची जि.प. शाळेस लोकमंगलचा पुरस्कार

**उ. सोलापूर** : लोकांमगल फाउंडेशनच्या वतीने आदर्श शाळा पुरस्कार उत्तर तालुक्यातील गुळवंची येथील जिल्हा परिषद शाळेला किर्लोस्कर सभागृह, टिळक स्मारक सोलापूर मध्ये देण्यात आला. सन्मानपत्र व चार हजार रुपयांची पुस्तके अशा स्वरूपात शाळेस पुरस्काराचे स्वरूप होते. सावित्रीबाई फुले युनिव्हर्सिटी चे कुलगुरू अरुण अडसूळ , लोकमंगल समूहाचे प्रमुख मा. आमदार सुभाष देशमुख, सोलापूर जिल्ह्यातील शिक्षण तज्ञ डॉ.ह.ना.जगताप सर, डॉ. आशालता जगताप मॅडम, डॉ. अरविंद जोशी यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.यावेळी मुख्याध्यापक,शिक्षक उपस्थित होते.

## सर्जापूर येथे दीड लाखांच्या दोन जर्सी गायी पळविल्या

सुराज्य/सोलापूर

गायरान शिवारात बांधलेल्या दोन जर्सी गाई चोरट्याने पळविल्या . ही चोरी सर्जापूर (ता.बार्शी ) येथे शनिवारी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. चोरीस गेलेल्या २ दुभत्या गाईंची किंमत दीड लाख रुपये इतकी असल्याची नोंद वैराग पोलिसात झाली आहे.

गेल्या काही दिवसापासून ग्रामीण परिसरात शेळ्या, गाई आणि इतर जनावरे चोरीस जाण्याच्या प्रकारात वाढ होत आहे. या प्रकारामुळे शेतकरी आणि ग्रामस्यात भितीचे वातावरण पसरले आहे.

या संदर्भात अनंता राजाराम कोरके (रा. सर्जापूर) यांनी वैराग पोलिसात फिर्याद दाखल केली. त्यांनी शुक्रवारी रात्री घराजवळील मैदानात २ जर्सी गाई बांधून घरात झोपले होते. पहाटेच्या सुमारास चोरट्यांनी दोरी कापून जनावरे चोरून नेली. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे . हवालदार सोनकांबळे पुढील तपास करीत आहेत.

## वाफेगाव बंधाऱ्यात जमिनी गेलेले शेतकरी मोबदल्याच्या प्रतिक्षेत

सुराज्य/टेंभुर्णी

बेंबळे येथिल भिमानदीवर वाफेगाव कोल्हापूर पध्दतीचा बंधारा असून या बंधाऱ्यामुळे नदीच्या पाण्याचा फुगवाटा तयार झाल्यामुळे बेंबळे येथिल ११ शेतकऱ्यांचे ४.६१ हेक्टर शेत जमिनी बाधित झाल्या आहेत. बुडीत क्षेत्राची भूसंपादन करण्याबाबत तत्कालीन महसूल मंत्री एकनाथ खडसे यांनी जिल्हाधिकारी सोलापूर यांना दि २५/१२/ २०१४ ला आदेश दिले होते त्यानुसार भूसंपादन कारवाई झाली, पण त्याचा मोबदला बाधित शेतकऱ्यांना अद्याप मिळालेला नाही. गेली दहा वर्षे बाधीत शेतकरी मोबदल्याच्या प्रतिक्षेत आहेत.



बाधित जमिनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी जिरायत घोषीत करून बाधीत जमिनीचे खाजगी वाटाघाटीने मुल्यांकन कमी करण्याचा अजब कारभार केला आहे. तसेच साल २०११ पासूनच्या कालावधीत वार्षिक खंडाची व पिकाची नुकसान भरपाई देणे बंधनकारक असताना ती बाधित शेतकऱ्यांना देण्यात आली नाही.

संपादित जमीन भीमा नदीकाठच्या व उजनी धरण लाभ क्षेत्रातील जमिनीमध्ये ऊस व केळी ही नगदी पिके घेतली जातात त्याच्यामुळे त्याची गणना बागायती शेती म्हणून करणे आवश्यक असताना खाजगी वाटाघाटीच्या प्रस्तावामध्ये सदर जमिनी जिरायत नमूद करून त्यानुसार प्रतिहेक्टरी कवडीमोल दर करून पाटबंधारे विभागाकडून शेतकऱ्यांची दिशाभूल करण्यात आली आहे.

सदरचा दर व वाटाघाटी ची प्रक्रिया संबंधित शेतकऱ्यांना मान्य नसून सदरची प्रक्रिया रद्द करून संपादनाबाबत नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ नुसार कार्यवाही करावी. तसेच सदरचा प्रस्ताव संपादीत होणारे गट हे वन विभाग क्षेत्रात येत नसल्याबाबतचा दाखला देणेवर प्रलंबीत असून याबाबतचा अहवाल वनविभागाने एक महिन्याच्या आत मा. जिल्हाधिकारी (सोलापूर) यांच्याकडे सादर करावा, त्यापेक्षा अधिक विलंब करू नये तत्पूर्वी खाजगी ताबा घेतल्यापासून ते आज अखेरपर्यंत ची शेतकऱ्यांना खंडाची रक्कम अदा करावी अशी मागणी भाजपा सोलापूर जिल्ह्याचे जेष्ठ सदस्य रत्नाकर कुलकर्णी बेंबळेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,पालकमंत्री, जिल्हाधिकारी यांना लेखी पत्रकाद्वारे केली आहे.

# पांडुरंग साखर कारखान्यासह तीन अधिकाऱ्यांना पुरस्कार

सुराज्य/श्रीपूर






कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास गळीत हंगाम २०२२-२३ साठीच्या सर्वोत्कृष्ट को जनरेशन प्रकल्प या पुरस्काराने तसेच कारखान्याच्या को जन मॅनेजरसह इतर तीन अधिकाऱ्यांना को जन असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेकडून दिल्या जाणाऱ्या पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

सदर पुरस्काराचे वितरण शनिवार दिनांक १६ सप्टेंबर रोजी पुणे येथे होणार आहे. यावेळी बोलताना कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ यशवंत कुलकर्णी यांनी माहिती दिली की कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास प्रत्येक वर्षी विविध पुरस्काराने सन्मानित केले जात आहे. मागील अनेक वर्षापासून कारखान्याला अनेक पुरस्कार मिळाले असुन याही वर्षी को जनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया या नामांकित संस्थेकडून को जनरेशन प्रकल्पामध्ये उत्कृष्ट काम केल्यामुळे प्रकल्पाच्या क्षमतेनुसार जास्तीत जास्त वीज निर्मिती करून जास्तीत जास्त वीज एम एस ई बी ला विक्री केल्यामुळे व संपूर्ण गळीत हंगामातील कामाचा आढावा घेऊन महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट सहकारी को जनरेशन प्रकल्प म्हणून पुरस्कार जाहीर झाला आहे.

कारखान्याचे कोजन मॅनेजर सचिन विभुते यांना बेस्ट को जनरेशन मॅनेजर हा स्पेशल पुरस्कार मिळाला आहे . इन्स्ट्रुमेंट मॅनेजर समीर सय्यद यांनाही बेस्ट इन्स्ट्रुमेंट मॅनेजर, बाळासाहेब गोरे वेस्ट इलेक्ट्रिक मॅनेजर म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. तसेच ईटीपी मॅनेजर म्हणून पांडुरंग कारखान्याचे सत्यवान जाधव यांना सन्मानित केले जाणार आहे.

सदर पुरस्काराचे वितरण हे दिनांक १६/९/२०२३ रोजी पुणे येथील टीप टॉप हॉटेल येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे तसेच उपमुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस आणि अजित दादा पवार आणि संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार व मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

को जनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेकडून मिळालेल्या पुरस्काराने कारखान्याच्या पुरस्कारात भर पडली असून यानंतरही असेच राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पुरस्कार कारखान्याच्या उत्तुंग कामगिरीमुळे मिळतील.कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास बेस्ट को जनरेशन पुरस्कार मिळाल्याबद्दल कारखान्याचे चेअरमन माजी आ प्रशांतराव परिचारक, व्हा चेअरमन कैलास खुळे , सर्व संचालक अधिकारी यांनी कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी तसेच कारखान्याचे कोजन मॅनेजर सचिन विभुते, इन्स्ट्रुमेंट मॅनेजर समीर सय्यद, बेस्ट इलेक्ट्रिक मॅनेजर बाळासाहेब होरे तसेच ईटीपी मॅनेजर सत्यवान जाधव यांचे अभिनंदन करून पुढील कारकिर्दस शुभेच्छा दिल्या.

## महत्त्वाचे वृत्त...

### अबब...नागपुरात दीड लाखांचा लाकडी बैल

नागपूर : तान्हा पोळ्याच्या पार्श्वभूमिवर बाजारात वेगवेगळ्या आकाराचे लाकडी बैल विक्रीला आहे. यवतमाळ येथील एका कलाकाराने तान्हा पोळ्यासाठी मोठा लाकडाचा नंदी बैल तयार केला आहे. या नंदीबैलाची किंमत दीड लाख रुपये असून तो नागपुरात महाल भागात विक्रीला ठेवण्यात आला आहे. यामध्ये एकाच लाकडावर कोरकाम करण्यात आले असून सुबक असा सहा फुटाचा नंदीबैल बनविण्यात आला. कलाकाराने याच्यावर मोठ्या प्रमाणात कलाकारी केली. अगदी हुबेहूब वाटावा असा हा साडेसहा फूट उंचीचा नंदीबैल आहे. पोळ्याच्या दिवशी पोळ्यात आकर्षणाच केंद्र ठरणार आहे. उद्या बैलांचा पोळा तर परवा तान्हा पोळा आहे. तान्ह्या पोळ्यात बच्चेकंपनी नंदीबैल घेऊन जातात.

### भरपाईसाठी महाराष्ट्र एक्सप्रेस रोखली

सांगली : लोहमार्ग रुंदीकरणात गेलेल्या जमिनीचा मोबदला मिळावा, अनाधिकृत सीमा हद्दीचे उभारण्यात आलेले खांब दूर करावेत या मागणीसाठी वसगडे (ता. पलूस) येथे सुमारे पाच तासांहून अधिक काळ महाराष्ट्र एक्सप्रेस रोखण्यात आली आहे. रेल्वे पोलीस सुरक्षा दलाचे अधिकारी तोडगा काढण्याच्या प्रयत्नात असून सायंकाळपर्यंत लोहमार्गावरील वाहतूक बंद होती. मिरज-पुणे मार्गाचे दुहेरीकरण व विद्युतीकरणाचे काम करीत असताना लोहमार्गाच्या बाजूच्या जमिनी संपादित करण्यात आल्या. या जमिनींचा मोबदला अद्याप मिळालेला नाही. याबाबत रेल्वे विभागाशी सातत्याने संपर्क साधून मोबदला मिळावा आणि अनाधिकृत उभारण्यात आलेले सीमाहद्दीचे खांब हटविण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. मात्र, रेल्वे प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे.

### मुंबईतून चोरलेल्या गाड्यांचा नेपाळ प्रवास

मुंबई : असुरक्षित जागी उभ्या करणे हे सत्तर टक्के गाड्यांच्या चोरीला जाण्याचे मुख्य कारण आहे. त्यामागे मोठ्या टोळ्या कार्यरत आहेत. मोटार चोरी करणारे इतके सराईत असतात की एखादी मोटार पळवण्यासाठी त्यांना केवळ तीन मिनिटे लागतात. मुंबईतील चोरीला गेलेल्या मोटारींची अगदी नेपाळमध्येही विक्री करण्यात आली आहे. मुंबईतून दिवसाला सरासरी ८ ते १० मोटारगाड्या चोरीला जातात. त्यामागे मोठ्या टोळ्या कार्यरत आहेत. मुंबईतील चोरीला गेलेल्या मोटारींची अगदी नेपाळमध्येही विक्री करण्यात आली आहे.

### राज्यातील कारागृहात अडीच हजार मनोरुग्ण

मुंबई : क्षमतेपेक्षा कितीतरी अधिक संख्येने कोंबल्याने राज्यातील कारागृहांतील कैद्यांमध्ये विविध आजार पसरत असताना कैद्यांमध्ये मनोविकारही बळावत चालल्याचे चित्र आहे. राज्यातील सर्व तुरुंगांत आजघडीला अडीच हजार कैदी मनोरुग्ण झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या कैद्यांवर उपचारासाठी आवश्यक औषधांचा तुटवडा आहेच; पण मानसोपचारतज्ज्ञही कमी आहेत. कोपर्डी येथील बलात्कार प्रकरणातील मुख्य गुन्हेगार जितेंद्र शिंदे याने रविवारी येरवडा कारागृहात गळफास लावून आत्महत्या केली. त्याच्यावर मनोविकारतज्ज्ञांचे उपचार सुरू होते, अशी माहिती कारागृह प्रशासनाने पत्राद्वारे दिली होती. या पार्श्वभूमीवर राज्यातील कारागृहांचा आढावा घेतला असताना अडीच हजार कैदी मनोरुग्ण असल्याचे समोर आले आहे.

### कर्नाटकातील महाविद्यालय विकायला काढले

पुणे : कर्नाटकातील वैद्यकीय महाविद्यालय विक्रीच्या आमिषाने दोन कोटी २१ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी धारवाड परिसरातून एकास अटक करण्यात आली. याप्रकरणी धन्वंतरी आयुर्वेदिक मेडीकल कॉलेज अँड रिसर्च सेंटरचे मुख्य प्रशासकीय अधिकारी संजोग महादेव देशमुख (रा. मायणी, ता. खटाव, जि. सातारा) यांना अटक करण्यात आली आहे. त्यांचे वडील महादेव रामचंद्र देशमुख, लक्ष्मण यंकप्पा आरमाणी, दिलीप सदाशिव चव्हाण यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एकाने सहकारनगर पोलीस ठाण्यात वकील ड. विजयसिंह पाटील यांच्यामार्फत तक्रार दाखल केली होती.

### पुण्यात आरएसएसची आजपासून समन्वय बैठक

पुणे : पुण्यातील एस.पी. कॉलेज येथे १४ ते १६ सप्टेंबर २०२३ दरम्यान राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा हेदेखील उपस्थित राहणार. या बैठकीला देशभरातील ३६ विभागांतील २६६ प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तसेच या तीन दिवसीय बैठकीत महिलांच्या समस्या, आपली संस्कृती, आपला देश, आपला धर्म यावर चर्चा होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले.

### कार-दुचाकीचा अपघात; दोन ठार

पुणे : मुंबई जुन्या महामार्गावर सोमाटणे फाटा येथे कार आणि दुचाकीच्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोघांचा मृत्यू झाला आहे. तर कारचालक जखमी असल्याची माहिती समोर येत आहे. अर्जुन शेळके आणि भालचंद्र अहिरकर असं अपघातात मृत्यू झालेल्या दोघांची नावे आहेत. दोघेही पिंपरी- चिंचवडमधील यमुना नगर येथील रहिवाशी आहेत. ही घटना आज सकाळच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी तळेगाव पोलीस अधिक तपास करत आहेत. या घटनेमध्ये कार चालक देखील किरकोळ जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. दुचाकी आणि कारचा भीषण अपघात झाल्याने यात वाहनांचं मोठं नुकसान झालं आहे. मृत्यू झालेले दोघेही दुचाकीवरून तळेगावच्या दिशेने जात होते. तेव्हा, कार आणि दुचाकीचा भीषण अपघात झाला.

### बेकायदा राहणाऱ्या ३ नागरिकांच्या कारवाई

नवी मुंबई : नवी मुंबईतील नेरुळ येथे एका झोपडपट्टीत तीन बांदलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे. या तिघांनी बेकायदा भारतात प्रवेश केला असून यातील दोघांनी १२ वर्षांपूर्वी आपल्या पालकांच्या समवेत तर तिसऱ्या आरोपीने ६ वर्षांपूर्वी पती समवेत भारतात प्रवेश केल्याचे समोर आले आहे. अहदुल इंजील मुल्ला, रत्ना अहदुल इंजील मुल्ला, आणि रिपा बिश्वास अशी यातील आरोपींची नावे आहेत. यातील अहदुल इंजील मुल्ला आणि रत्ना हे बांगलादेशातील जांगरी लंगडा गावातील रहिवासी आहेत तर रत्ना बांगलादेशातील मिर्जापूर येथील रहिवासी आहे. अहदुल इंजील मुल्ला (वय २६), रत्ना अहदुल इंजील मुल्ला (२१) हे दोघे १२ वर्षांपूर्वी आई वडिलांच्या समवेत भारतात आले होते.

### बेपत्ता मेकअप आर्टिस्टची हत्या

वसई : मागील एक महिन्यापासून बेपत्ता असलेल्या नायगावमधील मेकअप आर्टिस्ट नयना महंत (२९) हिची प्रियकराने हत्या केल्याचे उघड झाले आहे. नयनाचा मृतदेह सुटकेसमध्ये भरून गुजरातच्या वलसाड येथील खाडीत फेकून देण्यात आला आहे. याप्रकरणी नायगाव पोलिसांनी नयनाचा विवाहित प्रियकर मनोहर शुक्ला (४३) याला अटक केली आहे.नयना महंत (२९) ही तरुणी सिनेमात केशभूषाकार म्हणून काम करायची. ती नायगाव पूर्वेच्या सनटेक इमारतीत रहात होती. १२ ऑगस्टपासून ती बेपत्ता होती. याबाबत नायगाव पोलीस ठाण्यात तिच्या बहिणीने तक्रार दाखल केली होती. तपासात नयनाची हत्या तिचा पूर्वाश्रमीचा प्रियकर मनोहर शुक्ला (४३) याने केल्याचे उघड झाले आहे. आरोपी मनोहर शुक्ला याला मंगळवारी सकाळी अटक केली आहे.

# कामगारांना दणका, कंपन्यांवर उधळण

## कंत्राटी भरतीत अर्थ विभागाची शिफारस ▶▶ ७ टक्के, कंपन्यांना दिले १५ टक्के



सुराज्य/मुंबई

**कंत्राटी कर्मचारी भरतीत कंपन्यांना सात टक्के कमिशन देण्याची शिफारस राज्याच्या अर्थ खात्याने केली; पण नंतर तो वाढवून तब्बल पंधरा टक्के करण्यात आला. सध्या केवळ एक ते तीन टक्के कमिशनवर काम करणाऱ्या कंपन्या असताना पंधरा टक्क्यामागील निर्णयाचे गौडबंगाल काय असा सवाल केला जात आहे. दरम्यान, केवळ नऊ कंपन्यांना ठेका देताना तो सर्व विभागांना बंधनकारक करत सर्व भरती त्यांच्याच हातात देण्यामागे कोणता अर्थ' दडला आहे याची चर्चा वेगावली आहे.**

राज्यातील सरकारी कार्यालयातील सर्व पदे कंत्राटी पद्धतीने भरण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. यासाठी नऊ कंपन्यांना ठेका देण्यात आला. तो देताना सरकारचे पैसे वाचवितानाच कर्मचाऱ्यांना चार पैसे जादा मिळावेत यासाठी प्रयत्न झाले नाहीत. याउल भरघोस कमिशन देत कंपन्यांचे उखळ पांढरे केले आहे. सध्या अनेक कंपन्या केवळ एक ते तीन टक्के कमिशन घेत सरकारला कंत्राटी कर्मचारी पुरवत होते. पण सरकारने या सर्व कंपन्यांना नारळ देत विशिष्ट नऊ कंपन्यांनाच मान्यता दिली आहे.

नऊ कंपन्यांना ठेका देताना त्यांना कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या पंधरा टक्के कमिशन देण्यात येणार आहे. हे कमिशन सात टक्के असावे अशी शिफारस राज्याच्या अर्थ विभागाने केली होती. पण प्रत्यक्ष ठेका देताना हा आकडा वाढविण्यात आला.

सध्या केवळ तीन ते चार टक्के कमिशन घेऊन काही कंपन्या काम करत असताना या कंपन्यांना एवढे मोठे कमिशन देण्यामागे गौडबंगाल काय? अशी विचारणा होत आहे. पूर्वी कंपन्यांकडून कर्मचारी घेण्याची सक्ती नव्हती. पण नव्या आदेशानुसार याच नऊ कंपन्यांकडून कर्मचारी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. म्हणजे राज्यातील भरतीचे सर्व अधिकार या कंपन्यांना देत मक्तेदारी निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

कंपन्यांना सात टक्के कमिशन दिले असते तर कर्मचाऱ्यांना जादा पगार मिळाला असता. पण कर्मचाऱ्यांच्या ताटातील काढून कंपन्यांना जादा कमिशन देत सरकारने कोणता अर्थ शोधला असा सवाल केला जात आहे. मुळात कंत्राटी भरतीला विरोध आहे. त्यात कर्मचाऱ्यांऐवजी कंपन्यांचे हित साधण्याच्या अटी घालण्यात आल्या आहेत. यामुळे याबाबत नाराजी व्यक्त होत आहे.

कंत्राटी कर्मचारी भरतीला आमचा विरोध आहे. यामुळे गुणवत्तेला डावलले जाणार आहे. नोकरभरतीचे खासगीकरण करताना कंपन्यांना पंधरा टक्के कमिशन देण्याचा निर्णय म्हणजे कर्मचाऱ्यांच्या तोंडचे घास हिरावून घेऊन कंपन्यांचे हित साधण्याचा प्रकार आहे.

देशाप्रमाणे राज्यातही बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड आहे. महाराष्ट्रात सध्या ३२ लाख तरुण एमपीएससी, सरळसेवा भरती व महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाच्या परिक्षांसाठी तयारी करत आहेत. सरकार आरक्षणाच्या नावाखाली एका समाजाला दुसऱ्या समाजाशी झुंजवत ठेवून कुशल व अकुशल नोकऱ्यांचे आऊटसोर्सिंग करत आहे. अशा पद्धतीची नोकर भरती ही सुशिक्षित तरुणांचे शोषण करणारी आहे, सरकारने ही कंत्राटी नोकर भरती तात्काळ थांबवावी अन्यथा तरुणांच्या हितासाठी रस्त्यावर उतरु, असा इशारा प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी दिला आहे.

यासंदर्भात बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, राज्यात २.५ लाख सरकारी पदे रिक्त आहेत. तलाठी पदाच्या भरतीसाठी १४ लाख तरूणांनी अर्ज भरले आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात बेरोजगारी असताना राज्य सरकार जर कंत्राटी पद्धतीने नोकर भरत करत असेल तर हा सुशिक्षित तरुणांवरील अन्याय असून काँग्रेस पक्ष अशा नोकर भरतीचा निषेध करत आहे. या सुशिक्षित तरुणांना वेठबिगार करण्याचे शिंदे-फडणवीस-पवार सरकारचे प्लॅनिंग आहे का? हे एक मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री, एक फुल दोन हाफ, यांनी स्पष्ट करावे. हा सर्व प्रकार पाहता सरकारचे डोके ठिकाणावर आहे का? असा प्रश्न पडतो. राज्य सरकारने आऊटसोर्सिंग नोकर भरती बंद करावी अन्यथा विद्यार्थ्यांच्या हितासाठी काँग्रेस पक्ष तरुणांच्या बरोबर रस्त्यावर उतरेल.

उच्च शिक्षण घेऊन सरकारी नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांची ही घोर फसवणूक आहे. खाजगी कंपनीच्या माध्यमातून नोकर भरती करण्याचा प्रकार हा केवळ कंत्राटदारांच्या फायद्याचा आहे. १५ -२० हजार रुपये देऊन तरुणांची बोळवण करणार व कंत्राटदारांचे खिसे भरण्याचा हा प्रकार आहे.

## श्री गुरुचरित्र पारायण समाप्तीनिमित्त आनंद नगर येथे विविध धार्मिक कार्यक्रम

सुराज्य/सोलापूर





साधना-कुटी सत्संग मंडळ, भंडारकवठे व श्री गुरुदेव दत्त मंदिर सत्संग मंडळ, आनंदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने श्रावणमासानिमित्त आयोजित श्री गुरुचरित्र ग्रंथ पारायण समाप्ती कार्यक्रम गुरुवार रोजी सकाळी ८ वाजल्यापासून भजन, पुजन, पादयात्रा, महाआरती अशा विविध धार्मिक कार्यक्रमाने संपन्न होणार आहे. साधना-कुटी भंडारकवठे ते श्री पांडुरंग भजन मंडळ, हत्ताळी (कर्नाटक) श्री. जय हनुमान भजन मंडळ, विंचूर श्री मल्लिकार्जून एकतारी भजन मंडळ, तेलगाव श्री विठ्ठल भजन मंडळ, सादेपूर, श्री जय हनुमान भजन मंडळ, बाळगी या प्रमुख पाच दिड्यांचे आयोजन करण्यात आले असून त्याचबरोबर सुवासिनींचा जलकुंभ पादयात्रा, सहवाद्य मिरवणूकीसह आनंद नगर येथे श्री दत्त मंदिर परिसरातील औंदुंबर वृक्षांना जलकुंभ वाहण्यात येणार आहे. दक्षिण सोलापूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार मा.श्री.सुभाष (बापू) देशमुख यांच्या शुभहस्ते ग्रंथपूजन करुन ग्रंथास पुष्पार्पण कार्यक्रम व महाआरती कार्यक्रम संपन्न होणार आहे. त्यानंतर प.पू.श्री. भरतमुनी महाराज, बसवनगर प.पू.श्री. षडाक्षरी स्वामी विरक्त मठ, चडचण पू.श्री. लिंगण्णा शास्त्रीजी, कुंभारी यांच्या सुश्राव्य वाणीने प्रवचन कार्यक्रम मा.सुभाष (बापू) देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व भंडारकवठेचे नुतन सरपंच श्री भीमाशंकर बबलेश्वर, मा.श्री. किरण पुजारी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार असून प्रवचनानंतर श्री गोपाल जंगलगीयांच्याकडून महाप्रसाद वाटपाचे कार्यक्रम होणार असून सदभक्तांनी याचा लाभ घ्यावा.

## शरद पवारांच्या घरी 'इंडिया' समन्वय समिती बैठक

### देशभर जाहीर सभा घेण्याच निर्णय

सुराज्य/नवी दिल्ली

देशभरातील विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीने मुंबईत समन्वय समितीची घोषणा केली. यानंतर बुधवारी (१३ सप्टेंबर) दिल्लीत शरद पवारांच्या घरी या समन्वय समितीची पहिली बैठक झाली. या बैठकीत समितीने महत्त्वाचे निर्णय घेतले. यानुसार इंडिया आघाडी पुढील काळात देशभरात जाहीर सभा घेणार आहे. काँग्रेसचे नेते आणि समन्वय समितीचे सदस्य के. सी. वेणुगोपाल यांनी याबाबत माध्यमांना माहिती दिली.

के. सी. वेणुगोपाल म्हणाले, आज शरद पवार यांच्या घरी इंडिया आघाडीच्या समन्वय समितीची पहिली बैठक झाली. यात १२ पक्षांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

तृणमूल काँग्रेसचे अभिजीत बॅनर्जी यांना ईडीने समन्स पाठवल्याने या बैठकीला उपस्थित राहू शकले नाही. भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राजकीय सुडाच्या भावनेने ही कारवाई केली आहे.

समन्वय समितीने देशातील विविध भागात जाहीर सभा घेण्याचा निर्णय घेतला आहे. पहिली जाहीर सभा ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होईल. या सभेत वाढती महागाई, बेरोजगारी आणि भाजपाच्या भ्रष्टाचाराचे मुद्दे असतील. याशिवाय समन्वय समितीने जातनिहाय गणनेचा विषयही चर्चेत घेतला, असं के. सी. वेणुगोपाल यांनी सांगितलं.

के. सी. वेणुगोपाल यांनी इंडिया आघाडीच्या जागावाटपाबाबतही माहिती दिली. ते म्हणाले, समन्वय समितीने ठरवलं आहे की, जागा वाटपाची प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय घेतला. विविध पक्षांचे सदस्य बैठका घेऊन जागावाटप लवकरात लवकर निश्चित करतील.

## आयआरसीटीसीच्या वेबसाईटवरही आता आरक्षण

मुंबई : आयआरसीटीसीच्या (इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन) वेबसाईटद्वारे आता एसटी महामंडळाच्या बसचेही तिकीट आरक्षित करता येणार आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची ऑनलाईन बस बुकिंग सेवा सक्षम करण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्याची घोषणा आयआरसीटीसीने केली आहे. https://www.bus.irctc.co.in या वेबसाईटवर नजीकच्या काळात एसटी बसचे तिकीट बूकिंग करता येईल. ७५ टक्क्यांपेक्षा जास्त प्रवासी आता आयआरसीटीसीच्या ऑनलाइन तिकीट पोर्टलवरून त्यांच्या रेल्वे प्रवासाची तिकिटे बूक करत आहेत. आता एसटी बस बूकिंगची सुविधाही उपलब्ध झाली आहे. आयआरसीटीसी आणि एसटी महामंडळ यांच्यातील सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाल्याने प्रवाशांना त्यांच्या प्रवासाची व्यवस्था एकाच ठिकाणी आणि सुलभ पद्धतीने होणार आहे. या एकत्रीकरणामुळे प्रवाशांना सुरळीत प्रवासाची निश्चिती मिळेल, असे आयआरसीटीसीच्या सीएमडी सीमा कुमार यांनी सांगितले.

### तलाठी भरती घोटाळा

## आरोपींकडे आढळले २६ विद्यार्थ्यांचे हॉलतिकीट

सुराज्य/संभाजीनगर

तलाठी भरती परीक्षा मध्ये बसलेले परीक्षार्थी हॉल तिकीट मिळवून तलाठी भरती परीक्षेमध्ये परीक्षा देत असताना उत्तरे देणाऱ्या आरोपींना उत्तीर्ण करून देण्याची ऑफर देत होते. तसेच परीक्षार्थींना उत्तर पुरवणाऱ्या आरोपींना अटक केलेल्या आरोपींकडे पोलिसांनी केलेल्या तपासात आतापर्यंत २६ हॉल तिकीट आढळून आले. तर परीक्षा केंद्राच्या पर्यवेक्षकाकडे चार मख्खी हेडफोन आढळून आले आहेत.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील चिकलठाणा आय ऑन डिजिटल परीक्षा केंद्रावर ५ सप्टेंबर रोजी तलाठी भरती परीक्षेमध्ये केंद्रबाहेर संशयितरित्या आढळून आलेल्या राजू नागरे या याला एमआयडीसी पोलिसांनी उत्तरे पुरवताना रंगेहात पकडले. त्याची चौकशी केली असता परीक्षा केंद्रावरील कर्मचाऱ्यांच्या मदतीने तो परीक्षार्थी विद्यार्थ्यांना उत्तरे पुरवत होता अशी माहिती उघडकीस आली आहे. याप्रकरणी सिडको एमआयडीसी पोलिसांनी पर्यवेक्षक शाहरुख शेख, पवन सुरेश शिरसाट, बाली रमेश हिवराळे व विकी रोहिदास सोनवणे यांना अटक केली आहे यांच्या मदतीने राजू नागरे हा परीक्षार्थींना उत्तरे पुरवत होता. तर या रॅकेटचा मास्टर माईंड हा दत्त नालावडे असून तो पसार झाला आहे.

पोलिसांनी अटक केलेला आरोपींची झाडझडती घेतली असता फरार आरोपी दत्ता व पर्यवेक्षक शाहरुख हे शहरात एकाच खोलीमध्ये राहत असल्याचा समोर आलं यावेळी उपनिरीक्षक आत्माराम युगे अमलदार प्रकाश सोनवणे संतोष सोनवणे देविदास काळे व संतोष गायकवाड यांनी शाहरुखच्या खोलीची झाडाझडती घेतली असता यावेळी शाहरुखच्या खोलीमध्ये उत्तरे सांगण्यासाठी पुस्तके, अॅन्सर की सह तलाठी परीक्षेचे हॉल तिकिटे आढळून आले आहेत.

## हॉटेल मालक खून प्रकरणातील आरोपीचा येववड्यात मृत्यू

पुणे : उरुळी कांचन येथील हॉटेल गारवाचे मालक रामदास आखाडे यांच्या खून प्रकरणातील आरोपी बाळासाहेब खेडेकर याचा येरवडा जेलमध्ये मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. संपूर्ण जिल्ह्यात रामदास आखाडे प्रकरणाची चर्चा झाली होती. त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे. १८ जुलै २०१८ रोजी हॉटेल गारवाचे मालक रामदास आखाडे यांचा त्यांच्या हॉटेल जवळ कोयता आणि तीक्ष्ण हत्याराने खून करण्यात आला होता. या घटनेत. रामदास आखाडे गंभीर जखमी झाले होते. त्यांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर उपचार सुरू असताना यांचा मृत्यू झाला. त्यानंतर पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखत घटनेतील आरोपींना ताब्यात घेतले होते. त्यात बाळासाहेब खेडेकर आणि त्यांचा मुलगा आणि आणखी दहा जणांवर गुन्हा दखल करण्यात आला होता. यातील सर्वांवर मोक्का लावण्यात आला होता. उरुळी कांचन येथील हॉटेल गारवा चे मालक रामदास आखाडे यांच्यावर १८ जुलै २०२१ रोजी त्यांच्याच हॉटेलच्या परिसरामध्ये कोयता आणि धारदार हत्याराने हल्ला करण्यात आला होता. ज्यामध्ये ते गंभीर जखमी झाले होते. या हल्ल्याच्या दोन दिवसांनंतर रामदास आखाडे यांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला होता.



## पुसेसावळीत दोन गटांमध्ये वाद, एकाचा मृत्यू

सुराज्य/सातारा



सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यात पुसेसावळी येथे सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकल्यानंतर रविवारी रात्री उशिरा जाळपोळीची घटना घडली. या घटनेत एकाचा मृत्यू झाला असून १६ ते १७ जण जखमी झाले आहेत. याप्रकरणी सातारा पोलिसांनी सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट आणि जाळपोळकरुन नुकसान, जिवे मारण्याचा प्रयत्न आणि खून असे वेगवेगळे दोन गुन्हे दाखल केले आहेत. यामध्ये २३ जणांना अटक करण्यात आली आहे तर अन्य सहभागी असणाऱ्यांचा तपास सुरू करण्यात आला आहे. सध्या पुसेसावळी येथे मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला असून या भागात तणावपूर्ण शांतता पाहायला मिळत आहे. या घटनेच्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये गाड्यांची तोडफोड आणि जाळपोळ करताना काहीजण दिसत आहे. पुसेसावळीतील या प्रकरणात एकाचा मृत्यू झाला आहे. त्याचा मृतेदह ताब्यात घेण्यास समुहाने नकार दिला होता.यामुळे सातारा जिल्हा शासकीय रुग्णालयामध्ये मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झाला होता. जोपर्यंत सर्व आरोपींना अटक करण्यात येत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही असा आक्रमक पवित्रा नागरिकांनी घेतल्यानंतर काही वेळ रुग्णालय परिसरामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झालं होतं. मात्र, पोलिसांच्या आश्वासनानंतर मृताच्या नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला.

## ४० हजार वर्षांपूर्वीचा इतिहास समोर, पुरातत्व विभागाला खजिना सापडला

सुराज्य/नागपूर

भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीच्या खोऱ्यांमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरातत्व विभागाद्वारे सुमारे ४० हजार वर्षांपूर्वीच्या प्रागैतिहासिक गुफा शोधण्यात आल्या आहे. बावनथडी नदीच्या काठावर सापडलेल्या या गुफांमध्ये प्रागैतिहासिक काळातील चित्र आणि दगडी शस्त्र सापडले आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरातत्व विभागातील प्रमुख डॉ. प्रभाष शाहू यांच्या मार्गदर्शनात पीएचडी करणाऱ्या विवेक राऊत, शांतनू इंगळे आणि प्रवीण मेश्राम यांच्या चमूने हे शोधकार्य केले आहे. भंडारा जिल्ह्याची सीमा उत्तरेकडे मध्य प्रदेशच्या बालाघाटला लागून आहे. बालाघाटच्या परिसरात यापूर्वी प्रागैतिहासिक गुफा सापडल्या आहेत. सध्या प्राप्त झालेल्या गुफा, वैनगंगा नदीची उपनदी असलेल्या बावनथडी नदीवर आंतरराज्य सिंचन योजनेच्या अंतर्गत राजीव सागर धरणाचे कार्य सुरू आहे.



धरणाच्या कालव्याशेजारी या गुफा नागपूर विद्यापीठाच्या पुरातत्व विभागाला सापडल्या आहेत. 'विदर्भातील प्रागैतिहासिक स्थळे आणि वस्तूंवर संशोधन करण्यासाठी हा शोध महत्त्वाचा आहे. प्रागैतिहासिक काळातील मानवी वस्ती, राहणीमान, कला याबाबत या भित्तीचित्रांवर संशोधन केल्यावर अधिक माहिती मिळू शकेल. विदर्भातील प्रागैतिहासिक इतिहास समजण्यासाठी या स्थळांचे तात्काळ संवर्धन आणि दस्तावेजीकरण करावे लागेल', असे पुरातत्व विभागप्रमुख डॉ. प्रभाष शाहू यांनी सांगितले.

### मिळाले ३२ पिक्टोग्राफ

प्रागैतिहासिक गुफांमध्ये ३२ भित्तीचित्र सापडले आहे. यामध्ये मानवी चित्र ते पशुचित्र यांचा समावेश आहे. लालसर राखडी गडद आणि पांढरा रंग यांचा चित्रे काढण्यासाठी वापर करण्यात आला आहे. गुफेमधील काही चित्र इसवी पूर्व सुमारे ४० हजार वर्षांपूर्वीची (अप्पर पॅलोलिथिक) तर काही चित्रे इसवी पूर्व दहा हजार (मेसोलिथिक) काळातील आहेत. पाषाणयुगीन काही दगडी हत्यारेही येथे सापडली आहेत.

# शहरात विविध ठिकाणी दोघांची गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

शहरातील सोरेगाव आणि शेळगी परिसरात दोघां इसमांनी विविध कारणावरून राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची नोंदी शहर पोलिसात झाली आहे.




त्यापैकी पहिली घटना सोरेगाव येथील बनसिद्ध नगरात मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली. सुधीर विठ्ठल दुरके (वय ५० रा.सोरेगाव) असे गळफास घेतलेल्या इसमाचे नाव आहे. त्याने काल रात्री आठ वाजेच्या सुमारास घरातील छताच्या पंख्याला साडीने गळफास घेतला होता. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजते नाही. हवालदार शेळके पुढील तपास करीत आहेत.

**शेळगी येथे आत्महत्या**

दुसरी घटना शेळगी येथील महर्षी गौतम नगरात आज बुधवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. सत्यनारायण जगदीश हेडा (वय ४३) असे आत्महत्या केलेल्या अविवाहित इसमाचे नाव आहे. आज दुपारी १२ वाजण्याच्या पूर्वी त्याने घरातील छताच्या लोखंडी हुकाला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला . मयत सत्यनारायण हा अविवाहित आहे. त्याच्या खिशात चिठ्ठी सापडली. त्यात आजारास कंटाळून हे कृत्य केल्याचे लिहिलेले आढळले. या घटनेची नोंद जोडभावीपेठ पोलिसात झाली. हवालदार साळुंखे पुढील तपास करीत आहेत .

# सोलापूर जनता सहकारी बँकेस २६ कोटी रुपयांचा नफा

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर जनता सहकारी बँकेस आर्थिक वर्ष २०२२ – २३ मध्ये २६ कोटी १० लाख रुपयांचा निव्वळ विक्रमी नफा झाल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी दिली. बँकेची ५८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवारी हुतात्मा स्मृती मंदिरात खेळीमेळीच्या वातावरणात झाली.**

## अध्यक्ष सुनील पेंडसे : सभासदांना लाभांश देण्यासाठी बँक प्रयत्नशील




प्रारंभी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांच्या हस्ते लक्ष्मीदेवीच्या प्रतिमेचे पूजन करून आणि दीपप्रज्वलन करून वार्षिक सर्वसाधारण सभेचे उद्घाटन झाले. याप्रसंगी व्यासपीठावर बँकेचे उपाध्यक्ष ड. मिलिंद कुलकर्णी, संचालक प्राचार्य गजानन धरणे, ड. प्रदीपसिंह राजपूत, मुकुंद कुलकर्णी, वरदराज बंग, विनोद कुचेरिया, जगदीश भुतडा, चंद्रिका चौहान, रविंद्र साळे, आनंद कुलकर्णी, सी. ए. गिरीश बोरगावकर, राजेश पवार, पुरुषोत्तम उडता, मुख्य कार्यकारी अधिकारी मुकुंद कुलकर्णी, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य डॉ. अजितकुमार देशपांडे, पेंटप्पा गड्डम, सी. ए. राजेंद्र बुरा उपस्थित होते.

बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे म्हणाले, बँकेच्या संचालक मंडळाने सभासदांना ७ टक्के प्रमाणे लाभांश देण्यासाठी रिझर्व बँकेकडे प्रस्ताव पाठवला आहे. या प्रस्तावास अनुमती मिळताच सभासदांना लाभांश वाटप करण्यात येणार आहे. बँकेने पुढील पाच वर्षांकरिता व्हिजन डॉक्युमेंट तयार केले असून यात आणखी उत्कृष्ट ग्राहकसेवा, नवी संगणकप्रणाली, व्यवसाय वृद्धीसाठीचे प्रयत्न, नफा क्षमता वाढीचे प्रयत्न यांचा अंतर्भाव असून त्यानुसार कार्यवाही सुरू केली आहे, असे बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे म्हणाले.

आरबीआयने पतधोरणामध्ये पॉलिसी दरात सतत वाढ व बदल केल्याने त्याचा परिणाम ठेवी आणि कर्जे यांच्या व्याजदरात झाला आहे. अशा परिस्थितीतही बँकेने व्यवसाय वाढीसाठी विविध प्रकारच्या कर्ज योजना जाहीर केल्या आणि त्यातून समाजातील सर्व घटकांना फायदा व्हावा असा विचार केला. अमृत उत्सव कर्ज योजनेअंतर्गत कर्जावरील व्याजदर कमी करून खातेदारांना दिलासा देण्याचा प्रयत्न बँकेने केला असल्याचेही अध्यक्ष श्री. पेंडसे यांनी सांगितले.

याप्रसंगी संचालक प्राचार्य गजानन धरणे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मुकुंद कुलकर्णी यांनी सभासदांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. तसेच जेष्ठ सभासद डॉ. सतीश वळसंगकर यांनी सभासदांच्यावतीने उत्कृष्ट कार्याबद्दल बँकेच्या संचालकांचे अभिनंदन केले.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुकुंद कुलकर्णी यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले. बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी प्रास्ताविक केले. सुहास मुळुजकर यांनी सूत्रसंचालन तर बँकेचे उपाध्यक्ष ड. मिलिंद कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले.

### सभासदांनी केले अभिनंदन

भारतीय रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांना जागतिक पातळीवर सर्वोच्च केंद्रीय बँकरचे स्थान मिळाल्याबद्दल तसेच भारताची चांद्रयान मोहीम यशस्वी करणाऱ्या सर्व शास्त्रज्ञांचे अभिनंदन याप्रसंगी सर्व सभासदांनी केले.




# गौरीचे मुखवटे, दागिने बाजारपेठेत दाखल

सुराज्य/सोलापूर

गौरी गणपतीच्या आगमनाला अवघे काही दिवस उरले असून, बाजारपेठेत गौरी गणपतीच्या सजावटीसाठीच्या वस्तूंनी बाजारपेठ सजली आहे. विविध आकारातील गणपतीबाप्पाच्या मूर्ती, गौरीचे मुखवटे यांच्यासह गौरीसाठीचे दागिने, रेडीमेड साड्यांच्या खरेदीसाठी महिलावर्गाची लगबग सुरू झाली आहे.

यंदा गौरींचे आगमन २१ सप्टेंबर रोजी होणार आहे. गौरीचे पितळी, शाडू माती आणि पीओपीचे मुखवटे बाजारात उपलब्ध आहेत. सुबक आकारातील आखीव रेखीव मुखवटे लक्ष वेधून घेत आहेत. या मुखवट्यांची किंमत सुमारे हजार रुपयांपासून सुरू आहे. फायबर मूर्तींची किंमत साधारण चार हजार रुपयांपासून आहे. लहान मोठ्या आकारानुसार साधारण ४ हजार रुपयांपासून स्टँड उपलब्ध आहेत. गौरीच्या अखंड मूर्ती खरेदी करण्यालाही ग्राहक पसंती देत आहेत. गौरी सजावटीच्या वस्तूंच्या दरात १० ते १५ टक्क्यांची वाढ झाल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली. दागिन्यांमध्ये मोहनमाळ, ठुशी, बोरमाळ, लक्ष्मीहार, चपला हार, मोत्याचे सर, बाजूबंद, कानातील झुबे, वेल, पूर्ण कानवेल आदी पारंपरिक पद्धतीच्या दागिन्यांना महिलावर्गाकडून यंदा जास्त पसंती देण्यात येत आहे. हे दागिने साधारण २०० रुपयांपासून उपलब्ध आहेत. शहरातील टिळक चौक परिसरात मोठ्या प्रमाणात गौरीचे मुखवटे आणि स्टँड विक्रीसाठी आले आहेत.

## जरांगे पाटलांचे उपोषण मराठा आरक्षणासाठी नव्हते : अनिल परब

सुराज्य/पंढरपूर

जरांगे पाटील यांचे उपोषण हे मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी नव्हते तर मराठवाड्यातील मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यावे या मागणी साठी आहे, असा गौप्यस्फोट उद्धव ठाकरे गट शिवसेनेचे नेते अनिल परब यांनी आज पंढरपुरात केला. त्यांच्या वक्तव्यावरून नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

अनिल परब विठ्ठल रूक्मिणीच्या दर्शनासाठी बुधवारी पंढरपुरात आले होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. पुढे ते म्हणाले, वंशवळ न पाहता सरसकट कुणबी दाखले मिळावे अशी त्यांनी मागणी केली. सामाजिक, आर्थिक मागासले पण सिद्ध झाले पाहिजे. इम्परिकल डाटा जमा झाला पाहिजे. त्याशिवाय मराठा समाजाला आरक्षण मिळणार नाही. कुणबी विरुद्ध मराठा, मराठा विरुद्ध ओबीसी असा वाद निर्माण केला जात असल्याचा आरोप ही त्यांनी केला.

# दुहेरी पाईपलाईनसाठी आणखी ४१ ठिकाणची परवानगी आवश्यक

## ६३ पैकी २२ ठिकाणी मिळाली परवानगी

सुराज्य/सोलापूर

दुहेरी पाईपलाईन टाकण्यासाठी वेगवेगळ्या ८२ ठिकाणी भूसंपादन करण्यात आले आहे. मात्र यापैकी ६३ ठिकाणी विविध प्रकारची शासकीय परवानगी आवश्यक आहे. ज्यामध्ये क्रॉसिंग, खोदकाम करण्यासाठी परवानगी यासह इतर विविध बाबींचा समावेश आहे. सोलापूर महापालिकेने एकूण ६३ ठिकाणी अशा विविध परवानगी मागितल्या आहेत त्यापैकी २२ ठिकाणी मंजुरी मिळाली आहे तर ४१ ठिकाणी मंजुरी मिळण्याची प्रतिक्षा आहे.

१ जून २०२३ ला हैदराबाद येथील पोचमपाड या मक्तेदारास दुहेरी पाईपलाईन टाकण्याचा मक्ता दिल्यानंतर आजतागायत जवळपास १८ किलोमीटर पर्यंत लागणाऱ्या पाईपचा सप्लाय करण्यात आला आहे. दुहेरी पाईपलाईनचे जवळपास ८ किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित ४१ ठिकाणांवर सोलापूर महानगरपालिकेने मागणी केलेल्या विविध परवानगी मिळाल्यानंतर दुहेरी पाईपलाईन टाकण्याच्या कामाला आणखीन गती येईल असे महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी जिल्हा नियोजन बैठकीदरम्यान स्पष्ट केले.दुहेरी पाईपलाईनचे काम सध्या नियोजित बार चार्टनुसार होत आहे. या प्रकल्पाच्या कामाचा आढावा दर आठवड्याला आयुक्त स्वतः घेत असल्याचे देखील आयुक्तांनी बैठकीत सांगितले. सोलापूर शहराला ११० एमएलडी पाणीपुरवठा करणाऱ्या या दुहेरी पाईपलाईनचा प्रकल्प १८ महिन्यात पूर्ण करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करू असे देखील यावेळी सांगण्यात आले.



### जॅकवेलसाठीचे खोदकाम पूर्ण

दुहेरी पाईपलाईन प्रकल्पासाठी उजनी धरण क्षेत्रात जॅकवेल चे काम करण्यासाठी आवश्यक असलेले ३५ बाय ४० इतका लांब व १८ मीटर खोली इतक्या मोठ्या आकाराचे खोदकाम सध्या पूर्ण झाले असल्याचे देखील आयुक्तांनी सांगितले. या ठिकाणी सोलापूर महानगरपालिकेतर्फे जॅकवेल बसवण्यासाठी जलसंपदा विभागाकडे परवानगी मागण्यात आली आहे. कामासाठी मंजुरी आल्यानंतरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

## पूर्व विभाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी साळुंखे



सोलापूर : पूर्व विभाग मध्यवर्ती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी संजय साळुंके यांची निवड करण्यात आली. मंडळाची सभा मंगळवार पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय येथे संस्थापक अध्यक्ष जनार्दन कारमपुरी यांच्या अध्यक्षतेखाली विश्वस्त पांडुरंग दिड्डी, रामचंद्र जन्नू, विष्णु कारमपुरी, विजय गुल्लापल्ली, विनोद देविदास, अजय दासरी, सुरेश फलमारी, उमेश मामड्याल यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली इतर पदाधिकारी- कार्याध्यक्ष आशुतोष दंडी, संदिप महाले उपाध्यक्ष - अजय गवनी, सुरेश यल्लारम, कालीदास काळपगार, योगेश मार्गम, अविनाश मंगलपल्ली, सचिव अक्षय अंजीखाने, सहचिटणीस शेखर वडलाकोंडा, संदिप फत्तेपूरकर, राहूल एकबोटे, करण साळुंखे, विनोद मुत्याल, खजिनदार - अनिल वंगारी, सहखजिनदार नागेश मंजेली, किरण वल्लाल, प्रसिध्दी प्रमुख - रोहन श्रीराम, स्वयंसेवक प्रमुख चैतन्य जिंदम.

# महापालिका शिक्षण मंडळाच्या प्रभारी प्रशासन अधिकारीपदी बिराजदार

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या प्रभारी प्रशासन अधिकारीपदी याच कार्यालयातील प्रमुख लिपिक काशिनाथ बिराजदार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसे आदेश महापालिका उपायुक्त विद्या पोळ यांनी काढले आहेत. दरम्यान, त्याच कार्यालयातील प्रमुख लिपिकाकडे प्रभारी प्रशासन अधिकारी पदाचा कार्यभार सोपवण्याची ही पहिलीच वेळ आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमधून आनंद करण्यात आला.



शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी हनुमंत जाधवर हे सेवानिवृत्त झाल्याने येथील पद रिक्त झाले होते. त्यामुळे शासनाने शिक्षण विभागाकडील वेतन पथकाचे अधीक्षक विठ्ठल ढेपे यांच्याकडे अतिरिक्त पदभार दिला होता. दि. १ जून २०२३ रोजी ढेपे यांनी पदभार घेतला होता. दरम्यान, ढेपे यांनी नुकताच हा अतिरिक्त पदभार सोडला. हा अतिरीक्त कार्यभार काढून जिल्हा परिषदेचे प्राथमिक उपशिक्षणाधिकारी संजय जावीर यांना सोपविण्यात आला आहे. मात्र त्यांनी आजमितीस प्रशासनाधिकारी या पदाचा अतिरीक्त कार्यभार स्विकारला नाही. त्यामुळे जावीर यांनी शिक्षण मंडळाकडील प्रशासन अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार येईतोपर्यंत काशिनाथ बिराजदार यांचेकडे प्रशासनाधिकारी या पदाचा तात्पुरता (प्रभारी) पदभार देण्यात आला आहे. तसे आदेश महापालिका उपायुक्त विद्या पोळ यांनी आज काढले आहेत.

### आरोपानंतर पदभार काढल्याची चर्चा

ढेपे यांच्या विरोधात शिक्षक भारती संघटनेने जिल्हा परिषदेसमोर उपोषण केले होते. शिक्षकांची ७७ कोटीची बिले मंजूर करताना टक्केवारीचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला होता. तसेच शिक्षक संघटना व बचत गटाच्या आरोपानंतर शिक्षण विभागाने त्यांना पदावरून हटविण्याचा निर्णय घेतला असल्याची शिक्षकांमध्ये चर्चा होत होती.




## ग्रा.पं. सदस्य गुत्ती, उडानशिवे यांचा माने गटात प्रवेश

सोलापूर : एकरुख व तरटगाव येथील ग्रामपंचायत सदस्य सिंधु गुत्ती व श्याम उडाणशिवे यांनी माजी आमदार दिलीपराव माने यांच्या गटात प्रवेश केला. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. गावच्या विकासासाठी मी कधीही राजकारण करीत नाही राजकारणाच्या ठिकाणी राजकारण व इतर वेळी समाजकारण करत असल्याचे सांगून गावातील काही अडचणी, समस्या, सर्वसामान्याचे प्रश्न असतील ते सोडवण्यासाठी मी प्रयत्न करीन असे माने यांनी सांगितले. यावेळी मुजफ्फर जहागीरदार, लहू भोरे, उमर जहागीरदार, बबन मुमोलू, आप्पा उडाणशिवे, समीर शेख,इशाद जहागीरदार,नागनाथ गुत्ति,सिद्धेश्वर पारडे सह गावातील नागरिक उपस्थित होते.

# दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यातील १५ गावच्या पोलीस पाटलांचे आरक्षण जाहीर

सुराज्य/सोलापूर

: सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यातील वीस गावच्या पोलीस पाटलाची आरक्षण सोडत बुधवारी काढण्यात आली. यामध्ये तांदुळवाडी अनुसूचित जाती महिलेसाठी तर शेगाव अनुसूचित जमाती महिलेसाठी राखीव झाले आहे.

उपविभागीय अधिकारी क्रमांक दोन विठ्ठल उदमले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बुधवारी सकाळी अकराच्या दरम्यान ही आरक्षण सोडत काढण्यात आली. या आरक्षण सोडती मध्ये अक्कलकोट तालुक्यातील दहिटणेवाडी, हंदराळ, बासलेगाव, शावळ, मिरजगी या पाच गावचे पोलीस पाटील पद रिक्त ठेवण्यात आले आहे. अनुसूचित जातीच्या दोन जागेमध्ये तांदुळवाडी महिला तर कुरकोट अनुसूचित जाती सर्वसाधारण राखीव झाले आहे. अनुसूचित जमातीच्या चार जागेसाठी शेगाव महिलेसाठी राखीव तर मनगोळी, वांगी गुर्दे हल्ली हे तीन गावे अनुसूचित जमाती सर्वसाधारण राखीव झाले आहेत. ओबीसीच्या सहा जागेपैकी बुऱ्हानपूर व संगोगी आ. हे दोन गावे महिलेसाठी राखीव झाले आहेत. तर वडगाव, उळेवाडी आलेगाव गौडगाव खु. ही गावे ओबीसी सर्वसाधारण साठी आरक्षित झाली आहेत.



भटक्या जमाती ब होनमुर्गी महीला तर सांगवी खू.सर्वसाधारण राखीव झाले आहे. तसेच विमुक्त जाती अ जेऊरवाडी सर्वसाधारण साठी राखीव झाले आहे.






# गणेशोत्सवासाठी महापालिकेची जय्यत तयारी

## ८४ मूर्ती संकलन केंद्र, १२ ठिकाणी विसर्जन कुंड

सुराज्य/सोलापूर

श्री गणेश उत्सवानिमित्ताने सोलापूर महापालिका प्रशासनाची सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी जय्यत तयारी सुरू आहे. दरम्यान, यावर्षी सोलापूर शहरात गणेश विसर्जनासाठी एकूण ८४ मूर्ती संकलन केंद्र तर कुंड व विहीर असे एकूण बारा ठिकाणी मूर्ती विसर्जनासाठी व्यवस्था करण्यात आली आहे.

यावर्षी श्री गणेश मुर्ती विसर्जनासाठी महापालिकेच्या आठ विभागीय कार्यालय अंतर्गत गणेश मूर्ती विसर्जन ठिकाण , कुंड आणि विहिरी असे एकूण १२ ठिकाणी विसर्जन व्यवस्था करण्यात येत आहे. दरम्यान श्री गणेश मूर्ती संकलन केंद्रही उपलब्ध करण्यात येत आहेत. सन २०२२ मध्ये शहरात एकूण ८२ संकलन केंद्र उपलब्ध करण्यात आली होती तर यावर्षी श्री गणेश विसर्जनासाठी एकूण ८४ संकलन केंद्र शहरात विविध ठिकाणी उपलब्ध करण्यात येत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. शहरात गणपती घाट, कल्याणी कुंड (पठाण बाबादर्गा) / विष्णू घाट, म्हाडा विहिर विडी घरकुल, हिप्परगा येथील खाण, एम.आय.डी.सी. ओपन स्पेस प्रिसिजन फैक्ट्री जवळ , कंबर तलाव - ( ३ कृत्रिम कुंड), रामलिंग नगर विहिर, विष्णू मिल विहिर, बसवेश्वर नगर विहिर (श्री. अक्कलकोटे), अशोक चौक,पोलिस मुख्यालय विहिर, मार्कंडेय उद्यान विहिर व सुभाष उद्यान विहिर आधी बारा ठिकाणी महापालिकेच्या वतीने श्री गणेश मूर्ती विसर्जनासाठी व्यवस्था उपलब्ध करण्यात येणार आहे.